# जाऊं चला रे शिरडी–

( चाल : रघुपति राघव गजरी गजरी तोडित बोरें शबरी )

आपुल्या गुरूचे गानिं गात गुण ।
जाऊं चला रे शिरडी । शिरडी ।। ध्रु० ।।

मशिदिं बसली, मनीं पूजिली ।
गुरुरायाची मूर्त सांवळी ।
भिक्षेला जी भाजिभाकरी ।
मागतसे ती शिळीकोरडी ।। १ ।।

पायघोळ ती कफनी अंगीं ।
डोईला तें फडकें बांधी ।
भक्तांनीं जी आणुनि दिधली ।
वस्त्रें होती जाडीभरडी ।। २ ।।

वेड्यापरि ती गोष्टि सांगुनी ।
ज्ञानाच्या त्या खुणा पटवुनी ।
निजावयाला एक आड दिन ।
मिरवणुकीनें जात चावडी ।। ३ ।।

बालकृष्णसुत पितशा [ विनवी ] नमुनी ।
वंदुनि जानकिमाता चरणीं ।
सोडुं नका या साई लागुनी ।
देव भरितसे भक्तकावडी ।। ४ ।।

जानकी–बाळकृष्ण–तनय

(बाबांच्या बाळाचें बाळ.)

# दत्तावतार श्रीसाईबाबा

भारतामध्यें आतांपर्यंत अनेक अवतार होऊन गेले. किंबहुना भारत ही अवतारांची भूमि आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पण आपला सबंध इतिहास चाळून पाहिला, तर कोणत्याहि अवतारानें आपण अमुक एका देवाचा अवतार आहों हें कधींच कोणाला स्वमुखानें सांगितल्याचा दाखला आढळत नाहीं. हे अवतारी पुरुष मोठे आंतल्या गांठीचे असतात! आपण कोण आहोंत याची स्पष्ट कल्पना तर ते कधीं देत नाहींतच; पण अप्रत्यक्षपणें सुद्धां तसा त्यांचा प्रयत्न दिसत नाहीं. देव अवतार घेतो, आपलें कार्य करतो आणि देह ठेवतो.

जनतेमधील जाणते लोक त्यांच्या अलौकिक सामर्थ्यानें आकर्षित होतात आणि त्यांचा इतिहास लिहून इतरांपुढें ठेवतात. या इतिहासाचा—जीवनचरित्राचा आढावा घेतांना त्यांतून मिळणाऱ्या संदर्भावरून आणि निघणाऱ्या अनुमानांवरून चरित्रनायकांची ओळख करून घेऊन त्यांची योग्यता जाणावी लागते आणि ते कोण होते हें ठरवावें लागतें.

इतर अवतारांप्रमाणेंच साईबाबांनीहि आपण कोण आहों हें कधींच कोणास सांगितलें नाहीं. किंबहुना तें कळूं न देण्याची खबरदारी घेतली. त्यामुळें त्यांच्याहि बाबतींत ह्याच ठराविक मार्गाचा अवलंब करावा लागतो. ते कोण होते याचा विचार होण्यासाठीं आपण त्यांच्या जीवनचरित्राचा—श्रीसाईसच्चरिताचा आधार घेऊन त्यांतील निरनिराळ्या दाखल्यांच्या आधारानें ते कोणाचा अवतार होते हें पाहणें उपयुक्त ठरेल. सच्चरितांतील कांहीं संदर्भ उपयुक्त मार्गदर्शन करणारे आहेत.

## भाईची गोष्ट

पहिला संदर्भ—दाखला असा— मुंबईत भाई या नांवाचे एक गृहस्थ राहात असत. त्यांचें उपास्यदैवत अक्कलकोटचे स्वामी होते. स्वामींच्या तसबिरीची ते नित्य पूजा करीत असत. एकदां त्यांना अक्कलकोटला जाऊन स्वामींच्या पादुकांचें दर्शन घेण्याची तीव्र इच्छा झाली. त्यांनीं अक्कलकोटला जाण्याची सर्व तयारी केली. दुसऱ्या दिवशीं निघण्याचें निश्चित ठरलें. पण अक्कलकोटला जाण्याऐवजीं दुसऱ्या दिवशीं त्यांनीं शिर्डीची वाट धरली. त्याचें असें झालें कीं, त्याच रात्रीं त्यांना एक दृष्टांत झाला. त्यांत अक्कलकोटच्या स्वामींनीं त्यांना दर्शन दिलें आणि सांगितलें कीं, सध्यां माझा वास शिरडीस आहे तरी तूं शिरडीला प्रस्थान कर. दृष्टांतातील आज्ञेप्रमाणें भाईनीं अक्कलकोटचा बेत रहित करून ते दुसऱ्या दिवशीं शिरडीस निघाले. शिरडीस गेल्यावर त्यांना स्वामींच्या उद्गारांची प्रचीति आली. त्यामुळें ते शिर्डीस सहा महिने राहिले. भाईनीं या दृष्टांताचें स्मरण म्हणून शिरडींत गुरुपादुकांच्या निंबवृक्षाखालीं अक्कलकोटच्या महाराजांच्या

पादुकांची स्थापना केली. ही स्थापना शके १८३४ मध्यें श्रावण शु०॥ पर्वकालीं करण्यांत आली आहे.

या संदर्भावरून असें सिद्ध होतें कीं, अक्कलकोटच्या स्वामींनीं आपल्या भक्ताला दृष्टांत देऊन आपण व साईबाबा या दोहोंतील एकत्व पटवून दिलें. यावरून साईबाबा व अक्कलकोटचे स्वामी हे एकत्र होते असें सकृद्दर्शनीं वाटतें. तरीपण एवढ्यावरून निश्चित मत बनविण्यास एवढा हा एकच पुरावा पुरेसा वाटत नाहीं. शिर्डींत निंबवृक्षाखालीं या पादुका आजहि आहेत. त्यावरून या दाखल्याची सत्यता कोणासहि पटेल. पण त्याच्या जोडीला आणखी कांहीं पुरावा मिळाल्यास आपलें कार्य अधिक सुलभ होईल. यासाठीं साईसच्चरितांतील एक अध्याय वाचतांना एक महत्त्वाचा पुरावा सांपडतो. तो पुरावा असा :—

## पितळे यांचा अनुभव

मुंबईंत माधवबागेजवळील हरिश्चंद्र पितळे यांच्या मुलाला अपस्माराचा आजार होता. ते आपल्या आजारी मुलाला घेऊन पत्नीसमवेत शिरडीस साईबाबांच्या दर्शनाला गेले होते. मुलाला बाबांपुढें ठेवल्यावर बाबांची व त्याची दृष्टादृष्ट होतांच तो इतका बेशुद्ध झाला कीं, हा कांहीं तरी भलताच प्रसंग आला असें वाटून त्याच्या आईवडिलांना फार वाईट वाटलें. अपस्मारामुळें बेशुद्धपणा येतो हा अनुभव असला, तरी यावेळचा त्यांचा हा अनुभव अशा प्रकारचा होता कीं, त्यावरून तो मृत झाला कीं काय असें वाटूं लागलें. पितळे दांपत्य शोकाकुल झालें. तें पाहून बाबा म्हणाले, "त्याला उचलून बिऱ्हाडीं न्या. एक घटका गेली कीं कुडी सजीव होईल." आणि तसेंच झालें. एका घटकेनें मुलगा पूर्ण शुद्धीवर तर आलाच पण लवकरच त्याचा अपस्मार साफ बरा झाला. पुढें ही पितळे मंडळी मुंबईस येण्यास निघाली. तेव्हां मशिदींत बाबांची आज्ञा घेण्यासाठीं गेली. बाबांनी आज्ञा देतांना आपल्या खिशांतून तीन रुपये काढले आणि ते पितळे यांच्या हातीं देऊन म्हणाले, "बापू, मी तुला पूर्वीं दोन रुपये दिले आहेत. त्यांत हे तीन रुपये ठेव, आणि त्यांची पूजा कर." पितळे यांना बाबांच्या या उद्गारांचें मोठें आश्चर्य वाटलें. कारण यापूर्वीं ते कधींहि शिर्डीस आले नव्हते किंवा त्यांनीं बाबांना कधीं पाहिलेंहि नव्हतें. अर्थात् पूर्वीं आपण दोन रुपये दिले होते असें बाबा म्हणतात, या शंकेचें उत्तर त्यांना सांपडेना पितळे संशयांत पडले. बाबांकडून कांहीं खुलासा व्हावा या अपेक्षेनें बाबांना त्यांनीं तसा प्रश्न करून पाहिला. पण बाबांनीं कांहीं दाद लागूं दिली नाहीं. पुढें ते मुंबईला घरीं आले, तेव्हां आपल्या आईला त्यांनीं शिरडीची साद्यंत हकीकत सांगितली. त्यांच्या आईनेंहि बाबांच्या दोन रुपयांबद्दल आश्चर्य व्यक्त केलें. त्यांच्या आइला प्रथम हें कोडें उलगडलें नाहीं. पण थोड्याच वेळांत तिला मागील एका घटनेचें स्मरण होऊन ती मुलाला म्हणाली, 'बाबा बोलले तें सत्य आहे. आतां तूं तुझ्या मुलाला घेऊन शिर्डीला गेलास, त्याप्रमाणें तुझ्या वडिलांनीं तुला अक्कलकोटला नेऊन अक्कलकोटच्या स्वामींच्या पायांवर

घातलें होतें. तुझ्या पित्याची पूजा घेऊन स्वामी प्रसन्न झाले व त्यांनीं तुझ्या हातीं दोन रुपये दिले. या रुपयांची पूजा करण्यास त्यांनीं सांगितलें होतें. तुझ्या पित्याच्या मागें देवपूजा हें खेळणें होऊन बसलें. घरांतील लहान मुलें देवाची पूजा करूं लागलीं. मग रुपयांची दाद कोण घेतो ? कांहीं दिवसांनीं ती रुपयांची जोडी हरवली. आतां तरी या रुपयांची पूजा करा." मातेची ही हकीकत ऐकून पितळे सद्गदित झाले. भक्तीचें हें पुनर्जीवन पाहून बाबांच्या व्यापकतेबद्दल त्यांची खात्री झाली.

वर दिलेले दोन्ही उतारे समोरासमोर ठेवून विचार केला तर उत्तर काय मिळतें ? एका उताऱ्यांत अक्कलकोटच्या स्वामींनी आपल्या भक्ताला दृष्टांत देऊन आपला वास अर्थातच साईबाबांच्या रूपानें शिर्डीत असल्याचें पटवून दिलें. यावरून साईबाबा आणि अक्कलकोटचे स्वामी यांचें एकत्व दिसून येतें. पितळे यांच्या बाबतींतील पुरावा सत्य असल्याची खात्री पटवून घेण्यासाठीं त्यांच्या घरीं देव्हाऱ्यांत असलेले ते रुपये आजहि दृष्टीस पडतील. या पुराव्यावरून साईबाबांनीं आपण व अक्कलकोटचे स्वामी हे एकच आहोंत हें पटवून दिलें. म्हणजे अक्कलकोटचे स्वामी व साईबाबा या दोघांनींहि निरनिराळ्या घटनांच्या द्वारें आपलें एकत्व सिद्ध केलें आहे. अशा रीतीनें या दोघांचेंहि एकत्व निर्विवाद सिद्ध होतें.

## तपस्वी श्रीचिदानंद गोगटे यांचा खुलासा

साईभक्त श्री चिदानंद गोगटे यांनीं पुढील खुलासा श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्यासाठीं पाठविला आहे. श्री चिदानंद लिहितात:—

'सर्व लोकांस खुलासा होण्यासाठीं प्रसिद्ध करतों कीं, 'श्री चिदानंद स्वामी गोगटे तपस्वी हे श्री साईनाथांच्या गादीवर बसले' ही गोष्ट लोक बोलतात ती साफ खोटी आहे. तसा कांहीं एक प्रकार घडलेला नाहीं. श्री साईनाथांची मुळीं गादीच नाहीं; समाधि आहे, व पाठीमागें मूर्ति आहे. त्यांच्या जागीं बसण्याची माझी लायकी नाहीं. मी त्यांचा एक भक्त असून त्यांनीं दृष्टांतानें सांगितलेली कामगिरी मात्र करीत असतों. तरी कोणी उगाच गैरसमज करून घेऊं नये अशी नम्र विनंति आहे. कळावें.'

**चिदानंद गोगटे तपस्वी**

ता. ६-२-५६

मु० पालगड

## अक्कलकोटचे स्वामी

पण साईबाबा व अक्कलकोटचे स्वामी स्वामी एकच होते असें म्हटल्यावरून साईबाबा कोणत्या देवाचे अवतार होते हें सिद्ध होत नाहीं. त्यासाठीं अक्कलकोटचे स्वामी कोण होते हें पाहिलें पाहिजे. अक्कलकोटचे स्वामी कोण होते यासंबंधीं विचार करतांना त्यांचा जन्मेतिहास सांपडत नाहीं असें मागील एका प्रकरणांत म्हटलेंच आहे. तथापि त्यांच्या बाबतींत अनुमानावर अवलंबून राहण्याचें कारण नाहीं. प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध आहे आणि तो माणिकप्रभूनीं स्वमुखानें दिलेला आहे.

अक्कलकोटच्या स्वामींचा श्रीमाणिकप्रभूशीं संबंध, माणिकप्रभूनीं माणिकनगर वसविल्यानंतर आला. प्रभूंची माणिकनगरची वसाहत मूर्त स्वरूपांत आल्यावर अक्कलकोटच्या दरबारचा आणि जनतेचा माणिकप्रभूंशीं विशेष संबंध आला. प्रभूंच्या तेजानें व कार्यानें आकर्षित होऊन प्रभूंना अक्कलकोटला कायमचे घेऊन जाण्याची खटपट अक्कलकोटच्या राजघराण्यानें विशेष चालविली होती. बाबा सबनीस या नांवाचे गृहस्थ माणिकनगरला येऊन असत. त्यांनीं माणिकप्रभूनीं अक्कलकोटला येण्याविषयीं बराच आग्रह चालविला होता.

याच सुमारास एक परमहंस स्वामी प्रभूंच्या दर्शनासाठीं आले. ते आजानुबाहु, शरीरानें धिप्पाड असे होते. वृत्ति अत्यंत विरक्त होती. नेहमीं दिगंबर असत. ते फारसे कोणाशीं बोलत नसत. प्रभूशीं स्वामींची भेट झाल्यावर दोघेहि तीन दिवसपर्यंत एकान्तांत होते. स्वामींची इच्छा प्रभुसन्निध राहण्याची होती. पण प्रभूंनीं त्यांना 'झाडाखालीं झाड वाढत नाहीं, तुम्ही येथून अक्कलकोटास जा' असें सांगितलें. त्याच प्रमाणें माणिकप्रभूनीं बाबा सबनिसांस 'हे स्वामी तुमच्या गांवीं येतील व तुमच्या मनांतील हेतु पूर्ण करतील. हे दत्तात्रयाचे अवतार आहेत.' असें सांगितलें. माणिकप्रभूंचीं अनेक चरित्रें लिहिलीं गेलीं आहेत. पण या सर्व चरित्रांचा आधार घेऊन व इतर वास्तविक माहिती परिश्रमपूर्वक गोळा करून जें समग्र मोठें चरित्र लिहिलें गेलें आहे, त्यांत या गोष्टीचा उल्लेख आहे. दुसऱ्या एका ओवीबद्ध चरित्रांतहि हा उल्लेख स्पष्टपणें केला आहे. तो असाः—

> बाबा सबनीसास प्रभु बोलती। दोन वर्षांनीं ही दत्तमूर्ती।
> तुमच्या अक्कलकोटीं निश्चिती। जगत् हितार्थ प्रकटेल॥

माणिक प्रभूनीं अक्कलकोटच्या स्वामींबद्दल जे गौरवाचे उद्गार काढले त्याची बाबा सबनिसांना दुसऱ्याच दिवशीं प्रचीती आली. दुसऱ्या दिवशीं स्वामीजी डोक्यावर पांघरूण घेऊन झोंपले होते; अशा वेळीं बाबा सबनीस त्यांजपाशीं गेले. त्यावेळीं स्वामीजींनीं डोक्यावरील पांघरूण न काढतांच बाबा सबनिसांच्या मनांतील खुणेचे शब्द निवेदन केले. यावरून सबनिसांची त्यांच्या योग्यतेबद्दल खात्री झाली. पुढें हे स्वामी कांहीं कालानें अक्कलकोटास गेले. ते तेथें जाईपर्यंत त्यांचें नांव गांव

कोणासहि माहित नव्हतें. त्यानंतर त्यांचा अक्कलकोटला कायमचा वास राहिला. म्हणून अक्कलकोटचे स्वामी या नांवानें ते ओळखले जाऊं लागले.

## अवतारांमधील सांखळी

येथपर्यंत अक्कलकोटचे स्वामी कोण हें आपण पाहिलें. आणि त्यासाठीं माणिकप्रभूंच्या सांगण्याचा आधार घेतला. पण ज्या माणिकप्रभूंनीं अक्कलकोटचे स्वामी हे दत्तात्रयाचे अवतार होते, असें सांगितलें ते माणिक प्रभु तरी कोण होते बरें ?

श्री माणिकप्रभूंचा जन्म निजामांत कल्याण गांवचे मनोहरपंत नाईक या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या गृहस्थाच्या पोटीं झाला. त्यांचा जन्मकाल शके १७३९ शु० १४ मंगळवार हा आहे. मनोहरपंत हे एकनिष्ठ रामभक्त होते. त्यांना रामनवमी दिवशीं माणिकप्रभूंच्या जन्माबद्दल दृष्टांत झालेला होता. माणिक प्रभूंच्या जन्माविषयीं सर्व चरित्रकारांनीं एकमुखानें असें स्पष्ट लिहून ठेवलें आहे कीं, त्यांच्या जन्मकालीं चोहोंकडे दिव्य प्रकाश पडून श्री दत्तात्रय साक्षात् प्रकट झाले व वरप्रसाद देऊन बालरूप धारण करते झाले. माणिकप्रभूंनीं बालपणींच ज्या लीला दाखविल्या त्यावरून ते अवतार असल्याची सर्वांना लगेच खात्री पटली.

आतांपर्यंत केलेल्या एकंदर विवेचनावरून साईबाबा, अक्कलकोटचे स्वामी आणि माणिकप्रभु या तिघांही समकालीन अवतारांमध्यें एक सांखळी आहे; आणि या सांखळीचे तिघेहि दुवे आहेत असें दिसून येतें. ते तिघेहि भिन्न भिन्न स्थळीं भिन्न भिन्न स्वरूपांत वावरत होते असें असलें, तरीहि ते एकच होते हें त्यांनींच दाखवून दिलें आहे. माणिक प्रभु जन्मले ते दत्तावतार या स्वरूपांत अगदीं उघडपणें. त्यामुळें त्यांच्या बाबतींत शंकेला स्थान नाहीं. माणिकप्रभूंनीं अक्कलकोटचे स्वामी हे दत्तात्रयाचे अवतार असल्याचें स्वमुखानें सांगितलें आहे. म्हणजे एका अवतारानें दुसऱ्या अवताराची ओळख करून दिली. आणि अक्कलकोटच्या स्वामींनीं म्हणजे दुसऱ्या अवतारानें साईबाबा व आपण एकच आहोंत हें दाखवून दिलें. म्हणजे दुसऱ्या अवतारानें तिसऱ्या अवताराची ओळख करून दिली. साईबाबा हे दत्ताचे अवतार होते असा जो स्पष्ट आणि सुसंबद्ध पुरावा मिळाला आहे व ते दत्ताचे अवतार होते हें सिद्ध झालें आहे, त्याला स्वतः साईबाबांनीं एका प्रसंगानें अप्रत्यक्षपणें मंजुरी दिली आहे.

## आरतीचा पुरावा

हा प्रसंग नानासाहेब चांदोरकर जामनेरला मामलतदार असतांना घडला. नानासाहेब चांदोरकर हे बाबांचे मोठे भक्त होते. जामनेरला त्यांची कन्या प्रसूतिसमयीं आसन्नमरण स्थितींत होती. नानासाहेबांनीं या आणीबाणीच्या प्रसंगीं बाबांची प्रार्थना करण्यास प्रारंभ केला. इकडे शिर्डींत साईबाबा भक्ताच्या सांकड्यानें अस्वस्थ झाले होतेच. सुदैवानें त्याचवेळीं एक भक्त रामगीर बुवा हे खानदेशांत जाण्यास निघाले होते. ते बाबांची अनुज्ञा घेण्यासाठीं बाबांपाशीं आले. त्यांना बाबांनीं अनुज्ञा दिली. पण ती

देतांना, 'मध्यें जळगांवला उतरून जामनेरला जा व नानासाहेबांकडे थोडा मुक्काम करून मग पुढें जा' असें म्हणाले.

रामगीर बुवांना जामनेरला नानासाहेबांकडे जाण्याची त्यांनीं आज्ञा केली आणि जवळच असलेल्या माधवराव देशपांड्यांना म्हणजे श्यामाला अडकरांनीं केलेली आरती लिहून देण्यास सांगितलें. ही आरती अडकरांनीं श्री साईबाबांवर लिहिली आहे. श्यामानें ती आरती लिहून दिल्यावर, ती आरती व उदी रामगीर बुवांच्या स्वाधीन करून ती नानासाहेब चांदोरकर यांना देण्यास त्यांना सांगितलें. ही आरती भक्ताच्या संकटकालीं भक्तानें म्हणावी म्हणजे संकट दूर होईल म्हणून खुद्द बाबांनींच दिलेली असल्यामुळें, त्या आरतींतील अक्षरन् अक्षर साईबाबांना मान्य होतें, असा अर्थ होतो. '**आरती साईबाबा सौख्यदातारा जीवा**' ही ती आरती होय. या आरतींतील एक चरण असा आहेः—

कलियुगीं अवतार । सगुणब्रह्म साचार ।<br>
अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ॥

या आरतींत साईबाबा हे कलियुगीं दत्तावतार आहेत, असा स्पष्ट उल्लेख आहे. या बाबतींत साईबाबांनीं जर मुग्धता धारण केली असती, तर भाविक माणसाची सत्पुरुषावर ज्या प्रकारची श्रद्धा असते, त्या श्रद्धेंतून त्याच्या मर्जीप्रमाणें तो त्याचीं चित्रें चितारतो असें म्हणतां आलें असतें. पण वरील दाखल्यांत तसा प्रकार नाहीं. अडकरांची बाबांवरची श्रद्धा अतिरंजित नसून योग्य प्रकारची होती असाच याचा अर्थ होतो. कारण बाबांनीं ही आरती स्वतः भक्ताकडे पाठवून त्यांतील विधानांच्या सत्यतेवर शिक्कामोर्तब केलें आहे.

वास्तविक बाबा कोण होते हें ठरविण्यासाठीं या आरतीचा एकच पुरावा विचारांत घेतला, तर त्यावर एखादा नास्तिक मनुष्य असें म्हणूं शकेल कीं, बाबांना स्वतःचें स्तोम माजविण्याची इच्छा होती म्हणून या आरतीचा त्यांनीं उपयोग करून घेतला होता. कोणत्याहि कार्याचें मोल त्या कार्याच्या मागें असलेल्या उद्देशावरून केलें जातें. या दृष्टीनें ही आरती देण्यांत बाबांचा उद्देश भक्ताचें संकट निवारण व्हावें हा होता ही गोष्ट लक्षांत घेतली, कीं त्याचें महत्त्व पटेल. साईबाबा कोण होते याचा विचार करतांना जे स्वतंत्र व स्पष्ट पुरावे आढळले, त्यावरून ते दत्तात्रयाचे अवतार होते हें निःसंदिग्धपणें स्पष्ट आहे. या इतर पुराव्यांच्या जोडीला हा आरतीचा प्रासंगिक पुरावा घेऊन विचार केला, तर या सर्वच पुराव्याला बळकटी येते; आणि ते दत्तावतार होते ही गोष्ट अधिक ठळकपणें स्पष्ट होते.

## अवतारांची संगति

याप्रमाणें श्री माणिकप्रभु, अक्कलकोटचे स्वामी व साईबाबा हे दत्तावतार होते असें म्हटल्यावर अनेकांना आश्चर्य वाटेल. कारण दत्त, अवधूत आणि नरसिंह सरस्वती हे तीनच अवतार गुरुचरित्रांत दिले आहेत. म्हणजे हे तीन अवतारच प्रसिद्ध आहेत. असें असतांना आणखी ही अवतारमालिका कुठून उद्भवली, असा प्रश्न ते साहजिकच

विचारतील. थोडेफार चमत्कार करणारा एखादा साधु किंवा बुवा दिसला, कीं त्याला अवतार म्हणावें आणि दत्ताच्या नांवावर खपवावें ही एक तऱ्हा होऊन बसली आहे, असा ते आरोप करतील. पण वरील कारणें विचारांत घेतां त्या गोष्टींवर जसा अविश्वास ठेवतां येत नाहीं तसाच नरसिंह सरस्वतीनंतरच्या या पुढील अवतारांचें मूळ नरसिंह अवताराच्या वेळींच घडलें आहे, या सत्य गोष्टीकडे डोळेझांक करून भागणार नाहीं. नरसिंह अवताराच्या कार्यांतच पुढील अवतारांची संगति सांपडते.

दत्ताच्या नरसिंह अवतारानें एक विशिष्ट कारण उद्‌भवल्यानंतर आपण गुप्त होण्याचें निश्चित केलें ही माहिती गुरुचरित्रांत आहे. ते गुप्त होण्याचें कारण काय होतें पहा. एका रजकानें राजधुरंधर होण्याचा वर मागितला होता. तो पुढें म्लेंच्छ जातींत जन्माला येऊन बेदरी नगरींत राज्य करूं लागला. मुसलमान असूनहि पूर्वजन्माच्या संस्कारांमुळें तो ब्राह्मणांवर विशेष भक्ति करीत असे. हिंदु देवालयांना उपद्रव देत नसे. याबद्दल म्लेंच्छ पुरोहित त्याला दोष देत. म्लेंच्छांनीं हिंदूंच्या देवाब्राह्मणांची निंदा करावी; कारण हिंदु मूर्तिपूजा करतात; गाई, पृथ्वी, सोम, अग्नि, नदीचें पाणी, फार काय, लांकडालाहि देव मानतात, निराकाराला साकार समजतात; अशांना जे म्लेंच्छ भजतात, त्यांचा अधःपात झाला म्हणून समजावें, असें त्यांचें म्हणणें. त्यावर राजा म्हणतो, 'अणु रेणु, तृण, काष्ठ, पाषाण या सर्वांत ईश्वर भरला आहे. भेदाभेद आम्ही तर्कानें केले आहेत.' अशा प्रकारें हा यवन राजा व त्याची यवन प्रजा यांमध्यें दुमत निर्माण झालें. त्याच सुमारास राजाच्या मांडीवर एक स्फोटक उद्‌भवला. नाना प्रकारचे उपाय करूनहि तो बरा होईना. तेव्हां 'या यवनराजाला आतां माझें स्मरण होऊन तो माझ्या दर्शनाला येईल आणि राजाचें हें कृत्य मुसलमानांना न आवडून ते राजावर रुष्ट होतील. हळू हळू हिंदु मुसलमानांमध्यें झगडे निर्माण होतील.' असें नरसिंहसरस्वतींना वाटलें. शेवटीं नरसिंह सरस्वतींच्या अपेक्षेप्रमाणें राजा त्यांच्या दर्शनास आला. त्यानें त्यांना आपल्या राज्यांत येण्याचा आग्रह केला. अशा प्रकारें उघडपणें विरोधाला जें हें कारण घडलें, तेंच कारण आपल्या अस्तित्वामुळें दोन्ही समाजांतील लोकांनीं आपल्या दर्शनाला येण्यानें वाढीला लागेल, यासाठीं अशा वेळीं आपण गुप्त होणें इष्ट आहे, असा विचार करून नरसिंह सरस्वती कर्दळी वनामध्यें गुप्त झाले.

दत्त एकदां गुप्त झाल्यानंतर पुन्हा माणिकप्रभु या नांवानें प्रकट झाले आणि त्यांनीं ज्या प्रकारचें कार्य सुरू केलें तें विचारांत घेतां धर्माधर्मांतील झगडे नष्ट करण्यासाठीं परधर्मसहिष्णुतेच्या पायावर आचारधर्म स्थापित करण्याचें ठरवून, त्यांनीं हे पुन्हां अवतार घेतले असा याचा अर्थ होतो. या दृष्टीनें पाहतां नरसिंह अवतारानंतर, पहिले माणिकप्रभु, दुसरे अक्कलकोटचे स्वामी व तिसरे साईबाबा अशी ही पुन्हा त्रैमूर्तीची अवतारमालिका आहे.

[ श्री. अ. य. धोंड यांनीं लिहिलेल्या 'साईबाबा—अवतार व कार्य' पुस्तकांतून — ]

# श्री साईबाबांची शिकवण

# आत्म्याचें अमरत्व

: लेखक :

ना.वा.गुणाजी

अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥
—कठोपनिषद् २–१८
—भगवद्गीता २–२०

अर्थः—हा (आत्मा) अज, नित्य, शाश्वत व पुरातन असा आहे. शरीराचा वध झाला तरी याचा नाश होत नाहीं.

मनुष्य मरण पावल्यावर पुढें त्याचें काय होतें, तो असतो कीं नष्ट होतो, असल्यास तो कुठें असतो आणि काय करतो, इत्यादि विषयाची चर्चा फार प्राचीन काळापासून आतांपर्यंत चालू आहे. त्याचें थोडेसें दिग्दर्शन या लेखांत करण्याचें योजिलें आहे.

फार पुरातनकालीं कठोपनिषद्कर्त्या ऋषीनीं या विषयाला नचिकेतोपाख्यानानें तोंड फोडलें. कठोपनिषदाच्या आरंभीं नचिकेताची आख्यायिका दिलेली आहे ती अशीः—

परम सुखाची इच्छा करणाऱ्या वाजश्रवा नांवाच्या एका गृहस्थानें, ज्यांत सर्वस्वाचें दान दिलें जातें, असा विश्वजित् नांवाचा एक यज्ञ केला. त्याचा नाचिकेता नांवाचा एक पुत्र होता. वाजश्रवा धूर्त असल्यामुळें त्यानें दान देण्याच्या गाई खुबीनें निवडून काढल्या. त्या म्हाताऱ्याकोताऱ्या, वाळलेल्या, कुचकामाच्या, निरुपयोगी अशा होत्या. त्या गाई दान देण्यांत आल्यावर ब्राह्मण जेव्हां त्या घेऊन घरीं जाऊं लागले, तेव्हां कुमार नचिकेताला हा प्रकार आवडला नाहीं. त्याच्या मनांत श्रद्धा उत्पन्न होऊन त्याला असें वाटलें कीं, अशी प्रतारणा करण्यानें म्हणजे निरुपयोगी गाई दान दिल्यानें त्याचें फळ वाईटच मिळणार; म्हणजे आनंदरहित लोकांची प्राप्ति होणार. असा विचार करून तो आपल्या पित्याला म्हणाला, 'बाबा, तुम्ही मला कोणाला दान देणार?' पिता कांहीं उत्तर देईना. तेव्हां त्यानें तोच प्रश्न फिरून फिरून दोनतीनदां केला. त्यामुळें तो चिडून जाऊन म्हणाला कीं, 'मी तुला मृत्यूला देऊन टाकतों.' क्रोधाच्या आवेशांत पित्याच्या तोंडून हे प्रश्न गेले खरे, पण लगेच त्याला पश्चात्ताप झाला. पण नचिकेता सच्चा होता वचनाप्रमाणें मृत्यूला आपणाला देऊन टाकावें असा त्यानें आग्रह धरला आणि पित्याचें मन वळविलें. त्याच्या सम्मतीनें नचिकेता यमाच्या घरीं गेला. त्यावेळीं यमराजाची स्वारी घरीं नव्हती. तीन दिवस (अहोरात्र) नचिकेता यमाच्या घरीं उपाशीं राहिला. यम परत घरीं आल्यावर एक ब्राह्मण कुमार अतिथि घरीं आला असून तो तीन दिवस उपाशी आहे, त्याला अर्घ्यदान व अन्न देऊन त्याची शांति करावी, नाहीं तर तो शाप देऊन नुकसान करील असें यमाच्या

घरच्या मंडळीनें सांगितलें. तेव्हां यमानें त्या अतिथीचें योग्य प्रकारें स्वागत केलें आणि तीन दिवस उपोषण केल्यामुळें तीन वर मागण्यास सांगितलें. 'माझ्या पित्याचा राग शांत व्हावा, आणि मी परत घरीं गेल्यावर त्यानें मला ओळखावें, आणि पूर्वीप्रमाणें आमचा समेट व्हावा आणि माझा पिता संतुष्ट व्हावा,' हा पहिला वर नचिकेतानें मागितला. तो यमानें ताबडतोब दिला. दुसऱ्या वरानें स्वर्गसाधनभूत असें अग्निज्ञान त्यानें मागितलें, तेंहि यमानें ताबडतोब दिलें. नचिकेतानें तें ज्ञान ताबडतोब ग्रहण केल्यानें यम संतुष्ट झाला. आणि 'हा अग्नि तुझ्याच नांवानें प्रसिद्ध होईल' असें सांगितलें, आणि तिसरा वर माग असें म्हणाला. तेव्हां नचिकेत म्हणाला--

येयं प्रेते विचिकित्सा मनुष्येऽस्तीत्येके नायमस्तीति चैके ।
एतद्विद्यामनुशिष्टस्त्वयाऽहं वराणामेष वरस्तृतीयः ।। १२०

अर्थ--मनुष्य मरण पावला म्हणजे कोणी म्हणतात कीं तो असतो, आणि दुसरे कोणी म्हणतात कीं तो नाश पावतो; अशा तऱ्हेचा संदेह लोकांमध्यें रूढ आहे. तेव्हां याविषयीं तूं मला बोध करून याचा निर्णय मला सांग. हा माझा तिसरा वर आहे.

यम---देवांना सुद्धां पूर्वीपासून या प्रश्नाविषयीं संशय आहे. हा प्रश्न फार सूक्ष्म असून समजण्याजोगा नाहीं. याकरितां हा प्रश्न सोडून तूं दुसरा वर माग.

नचिकेता- देवांना पूर्वीपासून याविषयीं संशय होता आणि हें समजण्यास फार कठीण आहे हें खरें आहे; पण हें समजावून देणारा तुझ्यासारखा दुसरा कोणीहि मिळणार नाहीं. म्हणून यासारखा दुसरा कोणताहि वर आहे असें मला वाटत नाहीं.

यम-- हवें तर शतायु, पुत्रपौत्र माग. पशु पक्षी, अश्व, सोनें मागून घे. पृथ्वीचें मोठें मंडळ मागून घे आणि मनास वाटेल तितकीं वर्षें जग. संपत्ति माग, दीर्घायुष्य माग, राज्य माग; तुझ्या सर्व कामना मी पूर्ण करितों. या मृत्युलोकांत दुर्लभ असे कामभोग तुला सहज मागतांच मिळतील. रथांसह आणि वाद्यांसह अशा अप्सरा माग. तुझ्या इच्छेप्रमाणें मी त्यांचेकडून तुझी सेवा करवितों. पण **मरणाविषयीं प्रश्न करूं नको.**

नचिकेता—'हे अन्तका, हे सर्व भोग आज आहेत, उद्यां नाहींत, म्हणजे क्षणिक आहेत. शिवाय ते सर्व इंद्रियांचें तेज क्षीण करतात. सर्व (ब्रह्मदेवाचेंहि) आयुष्य अल्प आहे. यास्तव वाहनें आणि नृत्यगीतें तुझीं तुलाच असोत. धनानें मनुष्याची तृप्ति होत नाहीं. तुझ्या दर्शनानें व प्रसादानें हवें तेवढें धन व आयुष्य मिळेल. पण मला हीं नकोत, मला तो माझा वरच पाहिजे. जरामरणयुक्त असा पृथ्वीवरील कोणता प्राणी, गानवादनरति यांपासून होणारा आनंद नाशयुक्त आहे असें जाणल्यावर, आणि अजर व अमर अशा देवांकडे जाऊन आणि त्यांचेकडून याहून उत्कृष्ट प्राप्तव्य (प्रयोजन) साध्य होणारें आहे असें ज्ञान झाल्यावर अति दीर्घ जीवितामध्यें रममाण होईल? याकरितां हे मृत्यो! आत्म्याच्या महत्वाच्या अशा परलोकासंबंधाचें निर्णायक ज्ञान तूं मला सांग. हा प्रश्न गहन असला तरी त्यावांचून मी दुसरा वर मागणार नाहीं..

नचिकेता आपल्या मोहजालांत सांपडत नाहीं आणि आपल्या प्रलोभनांना तो तो दाद देत नाहीं असें पाहून यम फार खुष झाला आणि याबद्दल त्याची प्रशंसा करून यमानें त्याला उपदेश करण्यास प्रारंभ केला.

यमाच्या उपदेशास प्रारंभ करण्यापूर्वी नचिकेत्याच्या आख्यायिकेविषयीं थोडेंसें विवेचन करणें जरूर आहे. ही आख्यायिका किंवा कथा खरी आहे असें बहुतेक लोक-सांप्रदायिक आचार्यहि मानतात. पण ती तशी नाहीं. या लेखाच्या शेवटीं जी पुरवणी दिली आहे तींत नचिकेत्याच्या तीन कथा दिल्या आहेत. त्यावरून ही कथा काल्पनिक आहे असें दिसतें. त्या त्या ग्रंथकारांनीं आपणास जुळेल तशी ही कथा सांगितलेली दिसते. कठोपनिषदाच्या ऋषीनेंहि वाचकांची जिज्ञासा आणि कुतूहल वाढविण्यासाठीं आणि त्यांचें लक्ष्य वेधण्यासाठीं ही कल्पित आणि रोचक कथा आरंभीं प्रास्ताविक अशी सांगितली आहे. त्यांत आरंभीं अतिथिसत्कार आणि सर्व प्रलोभनांना दाद न देणारें तीव्र वैराग्य यांची महती वर्णिलेली आहे. या कथेचें थोडेंसें नीट व योग्य मनन केलें तर ही गोष्ट स्पष्ट दिसते. नचिकेता देहत्याग करून यमाकडे गेला, तेथें तीन दिवस राहिला, हें जर खरें असेल, तर तो 'मनुष्य मरण पावला असतां, पुढें तो असतो कीं नाहीं' असा संदेहाचा प्रश्नच विचारणार नाहीं. येथें यमाची भूमिका मृत्यूची किंवा अंतकाची नसून सद्गुरूची आहे आणि कठोपनिषत्कार त्याला 'महात्मा' असें संबोधितात (अ. १—१६) हें उपनिषद म्हणजे गुरुशिष्याचा प्रश्नोत्तररूपी संवाद आहे. तीन वर आणि त्यांतील मुख्य तिसरा वर हें सर्व अलंकारिक म्हणजे काल्पनिक असून मुख्य गोष्ट यमानें म्हटल्याप्रमाणें **मरणं मानुप्राक्षीः**'—मरणाविषयीं मला प्रश्न विचारूं नको ही आहे. तसेंच आपल्या उपदेशाच्या आरंभीं यमानें श्रेयस् आणि प्रेयस् यांची व्याख्या सांगून विद्या आणि अविद्या यांचें वर्णन करून आत्मा किंवा मुख्य तत्त्व यांचेंहि विवेचन केलें तेव्हां नचिकेतानें पुनः असा प्रश्न केला कीं, धर्माच्या व अधर्माच्या पलीकडचें, कार्य व अकार्य यांच्या पलीकडचें, आणि भूत व भविष्य यांच्याहि पलीकडचें असें जें श्रेष्ठ तत्त्व (ब्रह्म) तूं जाणतोस, तेंहि सांग (कठ. अ. २—१४). त्यावेळीं यम त्याला म्हणाला—'हे नचिकेता, तुझ्यासारखा प्रश्न करणारा (शिष्य) मला असावा.' यावरून आणि सर्व कठोपनिषद पाहून प्रथमपासून अखेरपर्यंत प्रश्नोत्तररूपी संवादच यांत आलेला आहे आणि हा संवाद नचिकेतोपाख्यानाच्या कोंदणांत बसविला आहे.

आतां यमानें नचिकेताला केलेला उपदेश थोडक्यांत सांगूं. श्रेय (श्रेयस्कर किंवा कल्याणकारक) आणि प्रेय (प्रियकर अथवा सुखकर) असे दोन भिन्न मार्ग किंवा गोष्टी आहेत. यांपैकीं बुद्धिमान पुरुष त्यांची योग्य परीक्षा करून श्रेय पसंत करतो आणि मंदधी पुरुष प्रेय पसंत करतो. तूं प्रेयाचा मार्ग टाकून श्रेयाचा मार्ग स्वीकारलास हें ठीक झालें. आतां आत्म्याच्या अमरत्वाविषयीं मी जें सांगतों तें नीट ऐक. प्रमादशील आणि वित्तमोहानें मूढ झालेल्या विवेकहीन लोकांना परलोक दिसत नाहीं. हाच लोक आहे, दुसरा नाहीं असें मानणारे ते पुनः पुनः माझ्या ताब्यांत—मायाजालांत सांपडतात.

हा आत्मा जन्म पावत नाहीं किंवा मरत नाहीं. हा दुसऱ्या कोणापासून उत्पन्न झालेला नाहीं. तो जन्मरहित, नित्य,क्षयरहित व वृद्धिरहित आहे. शरीराचा वध झाला तरी याचा वध होत नाहीं. पण आत्मज्ञान न झालेले कांहीं मनुष्य पुनः शरीरधारणेसाठीं अनेक योनींमध्यें प्रवेश करितात, तर कोणी वृक्षादि स्थावर भाव पावतात. जसें कर्म केलें असेल आणि जसें ज्ञान मिळविलें असेल ( **यथाकर्म यथाश्रुतम्** अ. ५, ७ ) तशी त्यांना अवस्था प्राप्त होते. मनुष्याच्या हृदयामध्यें ज्या कांहीं कामना आहेत, त्या सर्व नाहींशा झाल्या म्हणजे मनुष्य अमर होतो आणि तो याच देहीं ब्रह्मरूप होतो.

आत्मा हा रथी ( रथाचा मालक ) आहे, शरीर रथ आहे, बुद्धि सारथी आहे, आणि मन लगाम आहे. इंद्रियें हे अश्व आणि विषय हे त्यांचे मार्ग होत. ज्यांचें मन ताब्यांत नसतें आणि ज्यांचा बुद्धिरूपी सारथी अकुशल असतो, त्यांचीं इंद्रियें वाईट घोड्याप्रमाणें सारथ्याला वश नसतात. पण ज्यांचें मन ताब्यांत असतें, आणि बुद्धिरूपी सारथी कुशल असतो, त्यांचीं इंद्रियें चांगल्या घोड्याप्रमाणें सारथ्याला वश असतात. ज्यांचें मन ताब्यांत नसतें, जो बुद्धिरहित असतो, जो सर्वदा अपवित्र असतो, त्याला परम पदाची प्राप्ति होत नाहीं. त्याला पुनः पुनः संसारांत यावें लागतें. पण ज्याचें मन ताब्यांत असतें, जो बुद्धियुक्त असतो, जो सर्वदा पवित्र असतो. त्याला परम पदाची प्राप्ति होते; आणि पुनः तो जन्म ( म्हणून मरणहि ) पावत नाहीं.

इंद्रियांहून इंद्रियांचे अर्थ ( विषय ) श्रेष्ठ आहेत, इंद्रियांच्या अर्थांहून मन श्रेष्ठ आहे, मनाहून बुद्धि श्रेष्ठ आहे, आणि बुद्धीहून आत्मा श्रेष्ठ आहे. त्याहून अव्यक्त श्रेष्ठ आहे. अव्यक्ताहून पुरुष श्रेष्ठ आहे. पुरुषाहून श्रेष्ठ असें दुसरें कांहीं नाहीं. हीच शेवटची व श्रेष्ठ गति आहे. हा पुरुष ( आत्मा ) सर्व भूतमात्राचे ठायीं गूढ असतो, प्रगट नसतो. केवळ एकाग्र व सूक्ष्म अशा बुद्धीनें याचें दर्शन ( ज्ञान ) होतें. शहाण्या मनुष्याने वाणीचा ( सर्व इंद्रियांचा ) मनाचे ठिकाणीं लय करावा, मनाचा ज्ञानात्म्यांत, ज्ञानात्म्याचा महानात्म्यांत आणि महानात्म्याचा शांतात्म्यांत लय करावा. याकरितां हे जीव हो, उठा, जागे व्हा. श्रेष्ठ आचार्यांकडे जाऊन आत्मज्ञान प्राप्त करून घ्या. वस्तऱ्याच्या तीक्ष्ण धारेवर चालण्यासारखा हा मार्ग आक्रमण करण्यास कठीण आहे खरा, पण तो आम्हीं आक्रमण केला पाहिजे. सर्व वेद ज्याचें प्रतिपादन करतात, सर्व तपें ज्याचें वर्णन करतात, ज्याच्या इच्छेनें ब्रह्मचर्यव्रताचें आचरण करतात, तें ॐ म्हणजे प्रणव आहे. हेंच अक्षर ब्रह्म आहे, हेंच परम अक्षर आहे. याचें ध्यान करणें, याला जाणणें हाच ब्रह्मप्राप्तीचा सर्वोत श्रेष्ठ मार्ग आहे. हा आत्मा श्रवणानें प्राप्त होत नाहीं, बुद्धीनें किंवा पांडित्यानें प्राप्त होत नाहीं. ज्याला हा आत्मा पसंत करतो त्यालाच तो आपलें ज्ञान देतो व स्वरूप दाखवितो. पापकर्मांपासून परावृत्त न झालेला, भोगापासून उपरत न झालेला, एकाग्रचित्त न झालेला, किंवा अशांत अशा पुरुषाला ज्ञानाचेहि योगानें आत्मप्राप्ति होत नाहीं. हा आत्मा धूमरहित प्रकाशस्वरूप आहे. हा नित्य आहे, हेंच ब्रह्म आहे. मुंज नामक गवतांतून त्यांतील काडी जशी वेगळी काढतात, त्याप्रमाणें आत्म्याला धैर्यानें शरीरापासून पृथक् करावा ( शरीराहून भिन्न आहे असें ज्ञानानें जाणावें ). या लोकीं शरीरपातापूर्वीच

आत्म्याला जाणलें तरच मनुष्य जन्म–मृत्युरहित होतो, नाहींतर तो संसाराच्या फेऱ्यांत पडतो.

कठोपनिषदाच्या उपदेशांतील अत्यल्प भाग येथें ( वर ) दिला आहे. त्यावरून कठोपनिषदांतील तत्त्वज्ञान किती श्रेष्ठ दर्जाचें आहे याची वाचकांना कल्पना सहज येईल. जिज्ञासूंनीं या उपनिषदाचा मूळांतच योग्य अभ्यास करावा अशी शिफारस आहे.

**भगवद्गीता**–आतां आपण याविषयीं भगवद्गीतेंत काय सांगितलें आहे तें पाहूं. प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं, कठोपनिषद ही भगवद्गीतेची जननी आहे. भगवद्गीतेची रचना, कल्पना, विचार वगैरे बहुतेक सर्व कठोपनिषदांतून घेतलेलें आहे. मुख्य कल्पना अर्जुन रथी आणि श्रीकृष्ण सारथी, ही कठोपनिषदांतील 'आत्मा रथी व शरीर रथ आहे, बुद्धि सारथी आहे' या कल्पनेवरून घेतली असावी. नमुन्यासाठीं आणखी कांहीं थोडीं उदाहरणें घेऊं. कठोपनिषद, अध्याय २, तिसरी वल्ली, पहिला श्लोक, यांतील 'सनातन अश्वत्थ' वृक्षाची कल्पना भगवद्गीतेंत १५ व्या अध्यायांत विस्तारून वर्णिलेली आहे. कठोपनिषदांतील अ. १–३–१० यांतील इंद्रिय, मन, बुद्धि यांचे परस्पर संबंध भगवद्गीतेंत अ. ३–४२ यांत सांगितले आहेत. मुख्यबाब, आत्माचें अमरत्व, अविनाशित्व या विषयींचे उद्गार बहुतेक जशाचे तसे, उपनिषदांतून गीतेंत घेतले आहेत. उदाहरणार्थ पहा––

**कठोपनिषद्**. अ. १·२·१८–१९:– न जायते म्रियते वा विपश्चिन्नायं कुतश्चिन्न बभूव कश्चित् । अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ हन्ता चेन्मन्यते हन्तुं हतश्चेन्मन्यते हतं । उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥

**भगवद्गीता**––अध्याय २, १९–२०:–

य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥
न जायते म्रियते वा कदाचित् नायं भूत्वा भविता वा न भूयः।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥

याशिवाय इतर विचारांचीं आणि दुसरीं अनेक सादृश्यें आहेत. वर दाखविलीं इतकीं पुरे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे भगवद्गीतेंतील यांविषयींचे विचार कठोपनिषदांतील विचाराहून भिन्न नाहींत.

**भार्गवी–वारुणी विद्या**––याविषयीं तैत्तिरीयोपनिषदांत तिसऱ्या (भृगु) वल्लीमध्यें बरेंच विवेचन केलेलें आढळतें. याला भार्गवी–वारुणी विद्या म्हणजे भृगूला वरुणानें सांगितलेलें ज्ञान म्हणतात. याची कथा थोडक्यांत अशीः–भृगु आपल्या वरुणनामक पित्याकडे गेला आणि म्हणाला, 'हे भगवत्, मला ब्रह्मज्ञान सांगा.' वरुणानें सांगितलें कीं, 'ज्यापासून हीं भूतें उत्पन्न होतात, उत्पन्न झाल्यावर ज्याचे योगानें जगतात, आणि शेवटीं ज्याच्यामध्यें लीन होतात, तें ब्रह्म होय.' भृगूनें तपाचरण केलें. तेव्हां **अन्न** ( अन्नमय

कोश ) ब्रह्म आहे असें त्याला ज्ञान झालें. पण यानें त्याचें समाधान झालें नाहीं. म्हणून पुनः तो पित्याकडे गेला आणि ब्रह्मज्ञान सांगा असें म्हणाला. पित्यानें सांगितलें कीं, 'तपाचे योगानें ब्रह्म जाण, तप हेंच ब्रह्म ( ब्रह्मसाधन ) आहे.' पुनः त्यानें तपाचरण केलें. तप म्हणजे काय हा एक मोठा बिकट प्रश्न आहे. श्री एकनाथमहाराजांनीं याचा उत्तम खुलासा केला आहे. ते म्हणतात--

'शरीरशोषणा नांव तप। तें प्रारब्धभोगानुरूप। हरि हृदयीं चिंतणें चिद्रूप। तप सद्रूप त्या नांव पैं ॥ ८॥ जेणें दंभलोभ निःशेष आटे। अहंममता समूळ तुटे। यासचि नांव तप गोमटें। मानी नेटेपाटे विधाता ॥९॥' ( चतुश्लोकी भागवत श्लोक ७ ) तसेंच 'जागृत--स्वप्न--सुषुप्ती आंत। भगवत्प्राप्तीलागीं चित्त। झुरणीमाजी पडे नित्य। तप निश्चित या नांव ॥' ( एकनाथी भागवत अ. २५--५७ )

या प्रकारचें तपाचरण भृगूनें पित्याच्या आदेशानुसार चारपांचदां केलें. तेव्हां त्याला **प्राण** ( प्राणमय कोश ) ब्रह्म आहे, **मन** ( मनोमय कोश ) ब्रह्म आहे, **विज्ञान** ( विज्ञानमय कोश ) ब्रह्म आहे, आणि **आनंद** ( आनंदमय कोश ) ब्रह्म आहे, असा अनुभव आला. वेदांती परिभाषेंत हे पंचकोश तीन देहांच्या उल्लेखानें दर्शविले जातात. ते तीन देह म्हणजे स्थूल देह, सूक्ष्म देह आणि कारण देह. स्थूल देह म्हणजे जो हाडामांसाचा साडेतीन हात असा प्रत्यक्ष दिसतो तो. सूक्ष्मदेह म्हणजे पांच कर्मेंद्रियें, पांच ज्ञानेंद्रियें, पांच प्राण, मन व बुद्धि यांचा संघात. आणि कारण देह म्हणजे या दोन देहांला कारणीभूत असें जें मूळ अज्ञान तें. जीवाच्या या तीन देहांत--शरीरांत पंचकोशाचा समावेश होतो. तो असाः--स्थूल शरीराचें उपादान अन्न असल्यामुळें त्यास अन्नमय कोश म्हणतात. सूक्ष्म शरीराच्या ज्या १७ कला ( वर सांगितलेल्या ) आहेत, त्यांत पंचप्राण, मन बुद्धि हीं तीन्ही असल्यामुळें यांत प्राणमय, मनोमय व विज्ञानमय हे तीन कोश समाविष्ट होतात. तिसरें जें कारण शरीर तोच आनंदमय कोश होय. कारण त्यांतील आनंदमयता सुषुप्तींत सर्वांच्या अनुभवाला येते. झोपेंत सुखाचें भान नसेल, तर मी सुखानें निजलों होतों, अशी स्मृति जागृतींत होणार नाहीं; म्हणून सुखाचें ज्ञान झोंपेंत आहे. शिवाय तें सुख विषयांपासून होत नाहीं, कारण तेथें विषय नसतात. म्हणून झोंपेंत मिळणारें सुख आत्मरूपच म्हटलें पाहिजे. आत्मा स्वप्रकाश आहे, त्या प्रकाशानें सुखरूप आत्मा झोंपेंत भासतो. स्थूल, सूक्ष्म आणि कारण हे तीन्ही देह व्यभिचारी आहेत, म्हणजे कोणताहि एक देह, जागृत, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थेंत भासत नाहीं. आणि आत्मा मात्र सर्वावस्थांत भासतो म्हणून तो व्यापक आहे. अशा चिंतनानें तीन शरीरांहून किंवा पंचकोशांहून आत्मा पृथक् जाणावा. 'पंचकोशांचा जाणता। तो तूं आत्मा जाण आयता। ऐसा अनुभव तत्वतां। पाहुनि सुखिया तूं होई॥' असें निर्गुण भूपाळींत म्हटलें आहे. पण येथें एक लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, केवळ पंचकोशाहून आत्मा वेगळा जाणला म्हणजे एवढ्यानें इतिकर्तव्यता झाली असें नाहीं. तर कृतकृत्यता प्राप्त होण्याकरितां जीवब्रह्माच्या अभेदाविषयीं पुनः विचार किंवा तप करून अभेद किंवा ऐक्य साधलें पाहिजे. म्हणून तैत्तिरीयोपनिषद्‌कारांनीं असा उपसंहार

केला आहे कीं, या (पंचकोशात्मक) पुरुषाचे ठिकाणीं जो आत्मा किंवा ब्रह्म आहे, आणि जें आदित्याचे ठिकाणीं आहे, तें सर्व एकच आहे असें जाणून अनुभवी पुरुष इहलोक सोडून, अन्नमयादि पंचकोश व्यापून आणि तेहि आक्रमून, इच्छेस येईल तें अन्न सेवन करून आणि रूप धारण करून या लोकांमध्यें आनंदानें सामगान करीत संचार करीत असतो.

**भार्गवी-वारुणी विद्येचा सारांश**—आमचा देह म्हणजे अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय कोश हे अंतरात्म्याला झांकून टाकितात, म्हणून यांना पंचकोश ही संज्ञा आहे. यांपैकीं पुढील कोश मागील कोशाला व्यापून असतो; आणि प्रत्येक कोशाला व्यापून असणारा आणि सर्व कोशांला आधारभूत आत्मा एकच आणि त्या सर्वांहून निराळा असून कोशांचा नाश झाला तरी तो अमर अविनाशी असा असतो. हें जो स्वानुभवानें जाणतो तो ब्रह्माचे ठिकाणीं स्थित होतो, अन्नानें समृद्ध आणि समर्थ होतो; प्रजा, पशु, ब्रह्मतेज यांचें योगानें श्रेष्ठ होतो आणि कीर्तीनें श्रेष्ठ होतो.

**श्रीरमण भगवान**—या विषयींचे श्री रमण भगवान यांचे विचार स्पष्ट, श्रेष्ठ आणि अत्यंत मननीय असे आहेत. ते आतां आपण पाहूं.

**'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां। तो झाला सोहळा अनुपम्य॥'**

श्रीरमण भगवान सतरा वर्षांचे असतांना १८९६ सालीं त्यांच्या आयुष्यांत क्रांति करणारा असा एक अद्‌भुत प्रसंग घडून आला. त्याची हकीगत भगवानांनीं स्वतः सांगितली. तिचा आशय असा :— एके दिवशीं मदुरा येथें चुलत्याच्या घरीं माडीवर मी एकटाच बसलों असतां, एकाएकीं माझ्या मनांत मृत्यूची धडकी भरली. मी आतां मरणार असें मला वाटूं लागलें. असें कां वाटूं लागलें हें मला समजलें नाहीं. मित्रांचा, आप्तेष्टांचा किंवा डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असेंहि वाटलें नाहीं. हें संकट किंवा कोडें मीच स्वतः सोडवावें असा निश्चय केला. प्रथम मरण म्हणजे काय चीज आहे हें तरी पाहूं असें म्हणून मरणाचा अनुभव घेण्यास मी सुरुवात केली. हस्तपादादि अवयव पसरून ताठ केले. मढ्यासारखी शरीराची ठेवण केली. शवासनच घातलें म्हणाना. मरणाचा सीन (देखावा) हुबेहुब साधण्यासाठीं मी माझें तोंडहि बंद केलें, ओंठ आवळले, डोळे मिटले आणि श्वासहि बंद केला; आणि मनांत म्हटलें कीं, आतां हें शरीर तर मेलेंच, याला आतां स्मशानांत घेऊन जातील आणि जाळून भस्म करतील. पण काय चमत्कार सांगावा! लगेच त्या क्षणीं दुसरा एक विचार मनांत उद्भवला कीं, शरीर हें तर मेलें खरें, पण मी कांही मेलों नाहीं. शरीर जड व अचेतन झालें खरें, पण शरीराच्या पलीकडे—आंत 'मी' म्हणून कोणीतरी हें मरण पहाणारा आहेच. ती वस्तु कांहीं नष्ट झाली नाहीं. शरीराहून निराळ्या अशा त्या वस्तूचा मला भास होत आहे. तेव्हां शरीराहून भिन्न अशी चेतन वस्तु, चिद्वस्तु मी आहें असें ठाम ठरलें. तर्कानें किंवा वादविवादानें ही गोष्ट ठरली नाहीं. मला तर तिचें एकदम प्रत्यक्ष ज्ञानच झालें. बस्स, मृत्यूची धडकी जशी भरली होती तशी ती लगेच पार नाहींशी होऊन गेली. तेव्हांपासून 'मी' म्हणजे देह नसून शाश्वत, सनातन चिच्छक्ति आहे अशी माझी भावना कधींहि नाहींशीं झाली नाहीं. श्री तुकाराम महारा-

जानीं म्हटल्याप्रमाणें " मरण माझें मरोन गेलें। मज केलें अमर।" अशीच त्यांची स्थिति झाली.

भार्गवी-वारुणी विद्येचा सारांश -- श्रीरमण भगवानानीं आपल्या रमणोपनिषदांत ( उपदेशसारांत ) एका ( २२ व्या ) अवघ्या श्लोकांत स्पष्ट सांगितला आहे. तो असा—

श्लोकाची अवतरणिका—हृत् म्हणजे आत्मा, शरीर, इंद्रियें, प्राण, मन, बुद्धि इत्यादि ( पंचकोशाचें ) तम म्हणजे अज्ञान नव्हे. तो एकच सत्स्वरूप आहे. बाकी शरीरादि सर्व जड व असत् आहे. मूळ श्लोक असा—

विग्रहेंद्रियप्राणधी तमः।
नाहमेकसत्तज्जडं ह्यसत् ॥ २२ ॥

अर्थ—आपण (आत्मा) शरीर, इंद्रियें, प्राण, मन बुद्धि इत्यादि ( पंचकोश रूपानें असणारे ) तम म्हणजे ( परप्रकाश ) अज्ञान नव्हे. तो एकच सत्स्वरूप आहे. बाकी शरीरादि सर्व जड व असत् आहे.

तसेंच भगवानानीं आपल्या शिकवणीचें सार एका श्लोकांत अगदीं थोडक्यांत स्पष्ट सांगितलें आहे. तो असा—

**देहं** मृण्मयजडात्मकमहंबुद्धिर्न तस्यास्त्यतो
**नाहं** तत्तदभावसुप्तिसमये सिद्धात्मसद्भावतः।
**कोऽहं** भावयुतः कुतो वरधिया दृष्टात्मनिष्ठात्मनां
**सोऽहं** स्फूर्तितयाऽरुणाचलशिवः पूर्णो विभाति स्वयम् ॥

अर्थ—देह मातीच्या घटासारखा जड आहे. त्याला अहंबुद्धि ( अहंभाव ) नाहीं. म्हणून देह 'मी' नव्हे. पुनः देहभाव अगदीं नसतो अशा गाढ निद्रेंत आपण स्वयंसिद्ध आत्मरूपच असतो. तर 'मी' अहंभाव असलेला असा हा कोण आहे, आणि तो कोठून आला याचा शुद्ध मनानें-सूक्ष्मबुद्धीनें विचार ( शोध ) करून ज्यांनीं आत्मदर्शन घेतलें म्हणजे जे आत्मनिष्ठ झाले, त्यांच्या हृदयांत अरुणाचल शिव भगवान सोऽहं ( तो मी ) या स्फूर्तीनें पूर्णपणें प्रकाशित असतो.

या श्लोकांतील चारी चरणांतील पहिले शब्द म्हणजे **देहं, नाहं, कोऽहं सोऽहं** हे घेतले म्हणजे त्यांत भगवानांची सर्व शिकवण आलेली आहे. ती अशी:—**देहं नाहं** म्हणजे देह मी नव्हे, तर **कोऽहं** मी कोण ? **सोऽहं** (तो परमात्मा मी आहें). देहात्मभावना सोडून उलट पहा; अंतर्मुख व्हा म्हणजे सोऽहंचा ( जीवशिवऐक्याचा ) अनुभव येईल.

**श्रीसाईबाबा**—आतां याविषयीं श्रीसाईबाबांची शिकवण काय आहे तें पाहूं. मागें आम्हीं सांगितल्याप्रमाणें कोणतेंहि महत्वाचें तत्त्व अथवा सिद्धांत-मग तो उपनिषदांतला असो किंवा कोणत्याहि शास्त्रांतील असो-भक्तांना समजावून देण्याची

श्रीबाबांची पद्धत अगदीं और म्हणजे अलौकिक आहे. ते कोणत्याहि तत्त्वाविषयीं फारसें बोलत नाहींत, पण तें तत्त्व अनुभवून पाहिलें असल्यामुळें तें प्रत्यक्ष कृतीनें किंवा आचरणानेंच स्पष्ट दाखवीत असत. त्यायोगें भक्तांना तें तत्त्व अगदीं पटत असे. 'किंडरगार्टन' म्हणजे वस्तुपाठ पद्धतीप्रमाणें त्यांची शिकवण असे. त्यामुळें उपनिषदें म्हणजे वेदान्त यांतील तत्त्वें उत्तम रीतीनें म्हणजे आचरणानें प्रतिपादन करणारे बाबा हे श्रेष्ठ सद्गुरुच (महात्मे) होत.

श्री हेमाडपंत आपल्या साईसच्चरितांत, अध्याय २५ यांत, बाबांचें म्हणणें असें सांगतात कीं :—

झालों जरी गतप्राण । वाक्य माझें माना प्रमाण ।
माझीं हाडें तुर्बतीमधून । देतील आश्वासन तुम्हांस ॥१०५॥
मी काय पण माझी तुर्बत । राहील तुम्हांसवें बोलत ।
जो तीस अनन्यशरणागत । राहील डोलत तयासवें ॥१०६॥
डोळ्यांआड होईन ही चिंता । करूं नका तुम्हीं मजकरितां ।
माझीं हाडें ऐकाल बोलतां । हितगुज करितां तुम्हांसवें ॥१०७॥
मात्र माझें करा स्मरण । विश्वासयुक्त आचरण ।
ठेवा करा निष्काम भजन । कृतकल्याण पावाल ॥१०८॥

मी तर सोडा, पण माझी हाडेंहि (म्हणजे देहत्यागानंतर कबरीमधून) तुम्हांशीं बोलतील असें आश्वासन बाबानीं देऊन ठेविलें आहे, आणि त्याप्रमाणें त्यांच्या महासमाधीनंतर शेकडों म्हणजे अनेक भक्तांना तसा अनुभव आला आहे व येत आहे. देहपातानंतरची गोष्ट सोडा, पण देहप्राप्तीच्या पूर्वीहि बाबा आपल्या भक्तांशीं परिचय ठेवीत असत, म्हणजे ते कसे अमर व अविनाशी होते हें बाबांनीं स्पष्ट केलें आहे. त्याचीं कांहीं उदाहरणें खालीं देत आहों—

(१) **भक्तसखा शामा**—सोलापूरचे एक गृहस्थ सखाराम औरंगाबादकर यांच्या पत्नीला पुत्रसंतान नव्हतें. ती शिरडीला येऊन दोन महिनेपर्यंत बाबांची सेवा करीत राहिली आणि शामा म्हणजे माधवराव देशपांडे यांचे मध्यस्थीनें बाबांकडून पुत्रसंतानाचा वर (आणि पुढें पुत्रप्राप्तिहि) मिळविला. त्याप्रसंगीं एका दुपारीं बाबा आपले हात धूत असतां व माधवराव ते वस्त्रानें पुसत असतां बाबांनीं माधवरावाचा गालगुच्चा घेतला. तेव्हां माधवरावानीं रागाचा आव आणिला आणि म्हटलें कीं, 'हें काय लक्षण बरें का? गालगुच्चा घेणारा असला खट्याळ देव आम्हाला नको.' तेव्हां बाबांनीं प्रत्युत्तर दिलें कीं, "कधीं **अवघ्या बहात्तर पिढींत** । लाविला रे म्यां तुज हात । असें का स्मरत पहा बरें."

(२) **भक्तावतंस नाना**–इ. स. १८९२ सालीं नानासाहेब चांदोरकर हे कलेक्टरसाहेबाचें चिटणीस असतांना, शिरडीच्या आप्पा कुलकर्ण्यामार्फत आपणास येऊन भेटावें असा निरोप श्री बाबांनीं नगरास पाठविला. त्याला नानासाहेबांचा नकार

आला. पुनः २।३ वेळां निरोप गेल्यावर नानासाहेब भेटीस आले आणि साष्टांग प्रणिपात करून आपणास कां बोलाविलें असें श्री बाबांना विचारलें. 'अरे, जगांत काय थोडी माणसें आहेत, त्यांना न बोलावतां तुलाच मी कां बोलावतो याचें कांहीं तरी कारण असेलच कीं नाहीं,' असें बाबांनीं उत्तर दिलें. त्यावर नानासाहेब म्हणाले, 'तें कारण सांगा.' बाबा म्हणाले– 'तुझा व माझा **चार जन्माचा संबंध** आहे, तुला तो माहीत नाहीं, मला माहीत आहे म्हणूनच मी तुला बोलावितो'–

(३) श्रीमान बापुसाहेब बुटी यांचे जामात आणि पुण्याच्या इंजीनियरींग कॉलेजचे, भूगर्भशास्त्र व रसायनशास्त्र यांचे प्रोफेसर श्री. गणपतराव नारके एम. ए. एम्. एस्सी. हे प्रथम शिरडीस बाबाच्या दर्शनास गेल्यावेळीं, माधवराव देशपांडे यांनीं यांची ओळख करून दिली. तेव्हां बाबा त्यांना म्हणाले–'काय, तूं मला त्यांची ओळख करून देतोस ? मी त्यांना तीस पिढ्या ओळखतों.'

श्री नारके आणखी असें सांगतात कीं, बाबानीं कांहीं लोकांना त्यांच्या पूर्वजन्मांच्या आणि त्यांत घडलेल्या गोष्टींच्या हकीगती सांगितल्या; आणि माझ्याही पूर्वीच्या चार जन्मांतील गोष्टी सांगितल्या. श्री. नारके आश्चर्यानें मनांत म्हणाले– काय हें भूतकालचें अद्‌भुत ज्ञान !

भगवद्गीतेंत चवथ्या अध्यायाच्या प्रारंभीं, अर्जुनानें भगवन्ताला प्रश्न केला कीं, तुमचा जन्म अलीकडचा आणि सूर्य, मनु, इक्ष्वाकु यांचा फार प्राचीन काळचा, असें असतां तुम्ही हा योग त्यांना सांगितला हें कसें ? त्यावर भगवान म्हणाले कीं—माझे आणि तुझे पुष्कळ जन्म होऊन गेले, ते सर्व मी जाणतों, पण तुला ते आठवत नाहींत.

श्री साईबाबांची वरील उत्तरें भगवान श्रीकृष्णाच्या उत्तरांसारखींच आहेत.

**सिद्ध सद्‌गुरु**–वरील भार्गवी, वारुणी विद्येच्या शेवटी पंचकोश व्यापून आणि त्यांना अतिक्रमून यथेच्छ विहार करणाऱ्या आत्मज्ञानी सिद्ध पुरुषाचें वर्णन आहे. त्याचें प्रत्यक्ष उदाहरण साईबाबा आहेत. साईबाबा नेहमीं शिरडींत राहात असत. शिरडीच्या किंवा त्या गांवाच्या सीमेच्या ( ३।४ मैलावर ) बाहेर ते कधीं गेले नाहींत. तरी मशीदींत ( द्वरकामाईंत ) बसल्याठिकाणीं त्यांना साऱ्या बाह्य जगाचें ज्ञान असें. आगगाड्यांच्या वेळां, अनेक कारणामुळें त्यांत होणारा फेरफार, कोपरगांवाहुन नदींतून उतारु नेणाऱ्या बोटींच्या वेळां इत्यादि सर्व त्यांना बरोबर कळत असें. शिरडीस आलेले यात्रेकरू परत जातांना बाबाचा नमस्कार पूर्वक निरोप घेतेवेळीं बाबा या आगगाडयाच्या, बोटींच्या वेळां विषयीं कांहीं सूचना सांगत. त्या मानल्या तर भक्तांची यात्रा सुखकर होत असे. न मानल्या तर भक्तांना वाटेत गचके खावे लागत आणि त्रास होत असे, हें बहुतेक सर्वांनाच अनुभवानें कळून आलें होते.

बाबा द्वारकमाईंत राहूनहि परस्थळीं कशी मदत करीत असत याविषयींहि अनेक कथा आहेत. यांपैकीं एक मुख्य गोष्ट येथें देतो. इ. स. १९१० साली दिवाळीच्या

दिवशीं बाबा धुनीपाशीं बसून लांकडें धुनींत सारीत होते. धुनीहि जोरानें पेटत होती. इतक्यांत लाकडांच्या ऐवजी बाबानीं आपला हातच आंत खुपसला आणि तो लगेच भाजून गेला. सेवक माधव आणि माधवराव देशपांडे यांचें लक्ष्य तिकडे गेलें. त्यांनीं लगेच पाठीला विळखा घालून बाबाला मागें ओढलें आणि विचारलें, 'देवा हें काय केलें?' तेव्हां बाबा शुद्धीवर येऊन म्हणाले 'दूर एका गांवीं एक लोहाराची बायको आपल्या पोरीला खाकेंत घेऊन भट्टीचा भाता फुंकीत होती. तिच्या नवऱ्यानें हांक मारतांच तिचें लक्ष्य चुकलें आणि ती पोर एकदम भट्टींत पडली. मी त्या पोरीस बाहेर काढावयास गेलों तो हा प्रकार घडला. हात गेला तर जाऊं दे, पण ती पोर मात्र वांचली हें ठीक झालें.' भाजलेला हात बरा करण्याकरितां मुंबईहून डॉक्टर आले, पण बाबानीं त्यांना आपला हात दाखविला नाहीं. पुढें हात चोळण्याचें आणि पट्टी बांधण्याचें काम किंवा बाबांची ही सेवा करण्याचा योग महारोगी भागोजी शिंदे याला त्याच्या नशीबामुळें मिळाला आणि तो त्यांनीं बाबांच्या समाधीपर्यंत चालू ठेविला. बाबांची ही प्रेमळता, व व्यापकता, संकट निरसनता अगदी अपूर्व व अलौकिक होय.

वरील उदाहरण पाहतां त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, बाबा हें शिरडींत द्वारकामाईत असले तरी ते आपला पार्थिव देह तेथेंच ठेवून इतर देहानें बाहेर दूर गांवीं जाऊन जरूर असलेली मदत करीत असत. अशा तऱ्हेची अनेक उदाहरणे भक्तांनीं पाहिलेलीं आहेत.

शिरडीस बाबांच्या सान्निध्यांत बराच काल राहून ज्यांनीं बाबांच्या वर्तनाचें सूक्ष्म निरीक्षण केलें आहे असे एक विद्वान गृहस्थ प्रोफेसर गणपतराव नारके हे आपल्या जबाबांत असें सांगतात कीं, " To one deeply observing him, the startling fact came out into greater and greater prominence that Baba was living and operating in other worlds also, besides this world, and in an invisible body (P. 24-25 Devotees' Experiences PART I) याचा अर्थ असा कीं, बाबांचें सूक्ष्म निरीक्षण करणाऱ्या ह्या गृहस्थाला ही गोष्ट विशेष प्रामुख्यानें नजरेस येत असे कीं, ह्या लोकांतील (शिरडींतील) वास्तव्याखेरीज बाबा हे दुसऱ्या लोकांत अदृश्य (सूक्ष्म) शरीरानें राहत आणि वावरत असत. असा बाबांचा अधिकार आणि योग्यता जाणून हेमाडपंत श्रीसाईसच्चरित अध्याय २८ चे आरंभीं म्हणतात कीं :— साई नव्हे एक देशी । साई सर्वभूतनिवासी ।। आब्रह्म कीटक–मुंगी–माशी । व्यापक सर्वांशीं सर्वत्र ।। १ ।। साई शब्दब्रह्मीं पूर्ण । दावी परब्रह्मीची खूण ।। ऐसा उभय मार्गीं प्रवीण । तेणेंच सद्गुरुपण तयातें ।। २ ।। याच अध्यायांत श्रीबाबाचे असे उद्गार दिले आहेत कीं—

'माझिया प्रवेशा न लगे द्वार ।। नाहीं मज आकार ना विस्तार।। बसे निरंतर सर्वत्र।।१९९।। टाकूनिया मजवर भार । मीनला जो मज साचार ।। तयाचें सर्व शरीर व्यापार । मी सूत्रधार चालवी ।। २००"।। माझा माणूस देशावर । असो का हजारों कोस दूर । आणीन

जैसं चिडीचें पोर। बांधून दोर पायांस ॥ १५॥ ऐसें बाबा कितीदां वदले। जना लोकांहीं बहुती ऐकिलें ॥ अनुभवाही तैसेच आलें। कथितों त्या लीलेस बाबांच्या ॥ १६ ॥ असें सांगून (१) लाला लखमीचंद (२) बऱ्हाणपुरीबाई आणि (३) मेघा यांच्या कथा या अध्यायांत सांगितल्या आहेत.

आतां एका मुद्याविषयीं ऊहापोह करून हा लेख आटपूं, तो मुद्दा हा–श्री बाबांनीं "झालों जरी गत प्राण। वाक्य माझें माना प्रमाण। माझी हाडें तुर्बतीमधून। देतील आश्वासन तुम्हांस ॥" असें जें आश्वासन दिलें, तें पुढें त्यांनीं पाळलें काय आणि कशा रीतीनें पाळलें आणि पाळीत आहेत ? शेट दामुअण्णा कासार यांनीं आपला अनुभव १९३६ सालीं प्रसिद्ध केला आहे. ते आपल्या जबाबांत सांगतात कीं, श्री बाबा गेल्यावर माझी अवस्था काय होईल असें मी श्री बाबांना १९१०–११ सालीं विचारलें होतें. त्यांनीं उत्तर दिलें कीं जेव्हां जेव्हां माझें तू स्मरण करशील आणि जेथें जेथें करिशील तेव्हां आणि तेथें मी तुझ्याबरोबर राहीन' १९१८ सालाच्या ( बाबांच्या समाधीचा काल ) पूर्वीं आणि त्यानंतरहि आतापर्यंत बाबांनीं आपलें वचन पाळलें. अद्यापिहि बाबा माझ्याबरोबर आहेत. आणि ते मला मार्गदर्शन करीत आहेत.(भक्तानुभव भाग २ पा.७६ शेट दामु अण्णा कासारप्रमाणें शेकडों भक्तांचा अनुभव आहे. समाधीच्या पूर्वीं आणि नंतर श्री बाबांच्या काम करण्याच्या तऱ्हेंत एक फरक दिसून येतो. बाबा हयात असतां शिरडींत द्वारकामाईत बसून ते अनेक भक्तांना मदत करीत होते. आणि कांहीं विशेष प्रसंगीं सूक्ष्म देहानें बाहेर दुसऱ्या गांवीं जाऊन मदत करीत हें आपण वर पाहिलेलें आहे. पण बहुतेक आपल्या पार्थिव देहानें ते शिरडींत आपलें काम करीत. साडेतीन हात पार्थिव देहानें काम करणं म्हणजे तें, सान्त, परिच्छिन्न आणि मर्यादित असेंच असणार. पण श्री बाबांनीं जेव्हां १९१८ सालीं देहत्याग केला तेव्हां आणि तदनंतर पुढें ते या मर्यादेंतून मोकळे झाले आणि ते आपल्या सूक्ष्मदेहानें म्हणा किंवा आपल्या आत्मस्वरूपानें काम करूं लागले आहेत म्हणजे बाबांचें समाधीनंतरचें काम अनंत अपरिच्छिन्न आणि अमर्यादित असें होऊं लागलें आहे. याचें प्रत्यंतर पाहण्यास दूर जाण्याची किंवा चौकशी करण्याची जरुरी नाहीं. शिरडीस दरवर्षीं उत्सवास जे शेकडों हजारों भक्त येत असतात त्या सर्वांना, आणि मद्रास व मुंबई इलाख्यांतील अनेक ठिकाणच्या भक्तांना एकसमयावच्छेदेंकरून बाबांचे अनेक अनुभव येत असतात आणि त्यामुळें भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तेव्हां पूर्वींपेक्षां श्रीबाबा आतां विशेष '**जागृत**' देवता झालेले आहेत आणि लोकांचें कल्याण ( ऐहिक व पारमार्थिक ) करीत आहेत हें स्पष्ट आहे. अशा या अनंत अपरिच्छिन्न अविनाशी आत्मस्वरूपी साईबाबांना आमचे साष्टांग प्रणाम असोत.

अलीकडे विलायतेंत–इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका इत्यादि देशांत, आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें मृतांबद्दल माहिती मिळवून त्यांचेकडून संदेश मिळविण्याचे प्रयोग केलेले दिसून येतात. आणि श्री. लेडबीटर फ्लामारियां, रिशे, मायर्स, सर आलिव्हर लॉज

इत्यादि गृहस्थांनीं आपले अनुभव ग्रथित करून सुंदर ग्रंथ प्रसिद्ध केलें आहेत. ते सर्व वाचनीय आणि मननीय आहेत. तसेंच ६०।७० वर्षांपूर्वी तेथें 'Psychical Research Society' नांवाची संस्था स्थापन झाली असून ती याविषयासंबंधीं शक्य तितका पुरावा गोळा करून व त्याची छाननी करून आणि सशास्त्र प्रयोग करून मृतांचें अस्तित्व सिद्ध करण्यासाठीं अविरत परिश्रम करीत आहे. आणि सालोसाल या विषयावरील व्हाल्यूम ( ग्रंथ ) प्रकाशित करीत आहे. या सर्वांनीं 'मृतांचें अस्तित्व' शास्त्रीय पद्धतीनें सिद्ध केलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आमच्या देशांत श्री. व्ही. डी. ऋषि, बी. ए. एल.एल. बी. हे सद्गृहस्थ अनेक अनेक वर्षांपासून या विषयावर परिश्रम करीत आहेत आणि त्यांनीं कांहीं ग्रंथहि प्रसिद्ध केले आहेत आणि त्यांच्या प्रेरणेनें कोईमतूर, बंगळूर इत्यादि ठिकाणीं याविषयीं काम चालू आहे. मृतांचें अस्तित्व सिद्ध झालें खरें, पण ते कोणत्या लोकांत असतात, कसे राहतात आणि काय करितात इत्यादि खुलासेवार तपशील अद्याप प्रसिद्ध झालेला दिसत नाहीं. 'मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं' असें म्हणतात तें खरें दिसतें.

ॐ नमो भगवते श्रीसाईरमणाय.

---


## कै. पंडित मोतीलालजींचा दुसऱ्याच्या 'चष्म्यांतून' पहाण्यास नकार

ब्रिटिश अमदानींतील असेंब्लींत स्वराज्य पक्ष ह्या विरोधी पक्षाचे क. मोतीलालजी पक्षप्रमुख होते. एकदां पंडितजी चष्मा आणण्यास विसरले असतां एका युरोपियन एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरनें आपला चष्मा पुढें केला. हजरजबाबी पंडितजी तत्काळ म्हणाले, "माफ करा, मी आपल्या चष्म्यानें (दृष्टीनें) पाहूं शकत नाहीं."

दुसऱ्याच्या चष्म्यानें ( दृष्टीनें ) पहाणें सदोष आहे. सबब दूरदृष्टि ठेवून निर्दोष चष्म्यासाठीं भेटा.

**शेंडे आणि कंपनी, चष्म्याचे व्यापारी,** बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.

ताज्या सुगंधित फुलांचा मोहक सुगंध असलेलें **अत्तर लव्ह** वापरा

**गजानन जनार्दन बोडस** अत्तरवाले

**ठाकुरद्वार रोड, मुंबई २**

बाबांचे एक परमभक्त कै. माधवराव उर्फ श्यामा देशपांडे यांच्या आयुष्यांतील एका प्रसंगावर आधारलेलें आणि श्री साई–लीलांनीं नटलेलें एक रसपूर्ण आख्यान—

# श्यामाची तीर्थयात्रा

लेखिका–**मायावती गुर्तु**–( एल्. सी. पी. एस् )

[ आख्यानाला अनुरूप असा पूर्वरंग घ्यावा. आख्यान करण्यास कमीत कमी अडीच तास तरी लागतात असा अनुभव आहे. ]

**(१). शिखरिणी**

चरण कमल वंदी पार्वती–नंदनाचे ।
हृदय मयुर तुझ्या शारदे पायिं नाचे ।
हरुनि दुरित ठेवी, त्वत्करामाजिं अंबे ।
गुरुवर पदपद्मिं आसही चित्त रंगे ॥

**(२). नमन अभंग**

चंद्रभागेच्या तिरीं । पुंडलीक सेवा करी ।
उभा विठू विटेवरी । त्याचे पाय माझें शिरी ॥ १ ॥

गोदाकाठीं पैठणांत । वसे संत एकनाथ ।
प्रभू कावडी भरीत । जोडी तया दोन्ही हात ॥ २ ॥

स्वामी अक्कलकोटचे । नारसिंह सरस्वती ।
कोटी सूर्य तप तेज । नमस्कार तयाप्रती ॥ ३ ॥

चोखा मेळा हरीजन । जाणें विठ्ठल चरण ।
जाणे भक्ती नाहीं ज्ञान । वंदी तयांचे चरण ॥ ४ ॥

मीरा गानांत गुंगली । कृष्णस्वरूपी रंगली ।
प्रभुमंदिरिं नाचली । घेते माया पदधूली ॥ ५ ॥

गंगा पतीत पावना । वसे तीरी शंभुराणा ।
भक्त येतात दर्शना । तया पदीं हो वंदना ॥ ६ ॥

तीर्थराज रत्ना कर। जगन्नाथ अवतार।
मूर्ती प्रभूची सुंदर। जोडी तया दोन्ही कर ॥ ७ ॥
सागराच्या तीरावर। राहे प्रभू रामेश्वर।
भक्तप्रेमी हरीहर। तया माझा नमस्कार ॥ ८ ॥
बेट सागरी द्वारका। राही तेथें पार्थसखा।
दर्शन दे रावरंका। नाहीं उपमा त्या सुखा ॥ ९ ॥
अगा करवीर वासीनी। अंबा विश्वाची जननी।
देवकुलांची स्वामीनी। ठेवी मस्तक चरणीं ॥ १० ॥
संतसांई शिरोमणी। कीर्तिगाजे त्रिभूवनीं।
चित्त रमो तुझ्या गानीं। जोडीतसे दोन्ही पाणी ॥ ११ ॥
पूज्य माझी मात तात। विरागी ही संसारांत।
स्मरूनी त्या अंतरांत। उजळितें तूपवात ॥ १२ ॥

## (३) आर्या

कृष्णावतारीं अर्जुन, लक्ष्मण झाला तसाच रघुराया।
श्यामा वदती बाबा, माधव त्यांना म्हणे सदा देवा ॥
(अरे देवा)

## (४) ओवी

माधवराव भक्त थोर। सांईकृपेचा सागर।
दावोनिया चमत्कार। भक्ति प्रेम वाढवी ॥

## (५) अंजनी गीत

काकादीक्षित नागपुराला। करिती मुलाच्या व्रतबंधाला।
बाबा यावें त्या कार्याला। विनविती अति प्रेमें ॥

## (६) दिंडी

भक्त शांनी वैराग्यशील नाना। पुत्र मोठा सद्गुणी नम्र जाणा।
लग्न ठरलें ग्वाल्हेर राजधानी। आशिशा द्या वधुवरा चक्रपाणी ॥

## (७) शार्दूलविक्रीडित

नाना काका कशाला विनति मजला मी दुजा काय आहें।
शाम्याला नेइ आतां शुभसमयिं त्या मी पहा येत आहें।
आशीर्वादा बद्दला, वधुवरशिरीहि अक्षता टाकण्याला।
आहें मी तेथ जाणा नच कुणि पुन्हां पाठवूं आणण्याला ॥

## (८) पद : चाल = हजरत सलाम घ्यावा.

झडकरि इथोनि जाई, श्यामा ॥ धृ ॥
नागपुराला जा मुंजीला, ग्वाल्हेरला येई श्यामा ॥ १ ॥
काशी, मथुरा गया प्रयाग। मुक्ती पितया देई, श्यामा ॥ २ ॥
तुझी तयारी करूनी सारी। वाट तिथें मी पाही। श्यामा ॥ ३ ॥

### ९ ओव्या

आसा साईची वेऊन । माधवराव करिती प्रयाण ।
अप्पा भेटले तया लागून । म्हणती कोठें चालला ॥ १ ॥
काशीयात्रेचा हेतू धरिला । देवें आज्ञा दिधली मजला ।
चला तुम्हीही संगतीला । जाउ दोघे मिळूनी ॥ २ ॥
अप्पा मनीं विचार करिती । कोठोनि लाभे ऐशी संगती ।
जावयाचे करोनि निश्चिती । येतो म्हणती माधवा ॥ ३ ॥

### (१०) आर्या

आले नागपुराला । माधव अप्पास घेउनी संगे ।
ऐश्वर्य दीक्षितांचें, पाहुनि क्षण एक चित्त बहु रंगे ॥

### (११) शार्दूलविक्रिडित

केला थाट अचाट साठ घटिका ना न्यून्य हो भोजनी ।
बाळाच्या व्रतबंधनी सुखविलें भूदेव सर्वांहुनी ।
देती दोन शतें प्रफुल्लित मनें त्या रौप्यमुद्रा तया ।
व्याहो प्रार्थिति आदरें, मजवरी येवोनि केली दया ॥

### (१२) साकी

ग्वाल्हेराला जठार सदनीं माधव अप्पा आले ।
अमरापुरी वैभव शोभें बघुनी अंतरीं धाले ।
नाना सन्मानें । घेती राहुनी प्रेमानें ॥

### (१३) पद–चाल–जिव बावरा

वधु गोरटी, अति सुंदरा । गमे इंदिरा । त्याजि सागरा ॥ धृ० ॥
ही घालि कंठीं सुम शुभ्रमाला । ये वासुदेवा, गृहीं मंगला ॥ १ ॥
शशि रोहिणी कां, त्यजुनी नभाला । कां दक्ष कन्यावरी शंकरा ॥ २ ॥

### (१४) शार्दूल विक्रीडित

लक्ष्मी वासकरी कृपा कर शिरीं ठेवीतसे शारदा ।
ग्वाल्हेरांत जठार थोर असूनी, वाणींत होती सुधा ।
नाहीं गर्व मुळीं उदार हृदयीं, वंदोनि होते धवा ।
देती शंभर रौप्य राज वदना, अत्यादरें माधवा ॥

### (१५) आर्या

शंभर रुपये दिधले, नानांनीं माधवास त्या समयीं ।
काशी गया प्रयागा, जाण्याला बंध राहिला नाहीं ॥

### (१६) दिंडी

जठारांचे घेवोनि लिखित संगें । अयोध्येला दोघेहि येति वेगें ।
आदरानें मंदिरीं माधवाला । पुजाऱ्यानें रघुराज दाखवीला ॥

### (१७) अंजनी गीत

नगरि अयोध्या शरयूकांठीं । लक्ष्मण सीतेसह जगजेठी ।
मनमोहन प्रभु पडेल दृष्टीं । भाग्य जरी मोठें ॥

### (१८) पदः

शरयू कांठीं । राहिला उभा जगजेठी ॥ धृ० ॥
कौसल्येच्या उदरीं आले । कैकेयिचि तरि वंदि पाउलें ।
जनकगृहीचें धनू तोडिलें । सीतेसाठीं ॥ १ ॥
चौदा वर्षें वनवासांत । मारी रावण लंकापुरित ।
भिल्लिणिची प्रभु बोरें चाखित । भक्तीसाठीं ॥ २ ॥

### (१९) अभंग

सांवळा पाहिला राम घननीळ । हृदय चंचल स्थिरावलें ।
पाँही निरखून दिसे बाबासांई । सांठवि हृदयिं रामराया मी ॥
चैत्र नवमीचा उत्सव पाहोनि । काशीला तेथोनि येती दोघे ॥

### (२०) पद

मंगल घाटावरी हो श्रीगंगेच्या तिरीं ।
वैकुंठेश्वर सवें लक्ष्मी, उभा असे मंदिरीं ॥ ध्रु ॥
मूर्ती सुंदर अति घडविली । गदा चक्र घे करीं ।
सुबक नासिका वेल फुला ती शोभा ये मंदिरीं ॥ १ ॥
ब्रह्मानंदीं जीव रंगला, बघुनि मूर्ति गोजिरी ।
भेटायाला शिवरायाला, गमे येत श्रीहरी ॥ २ ॥

### (२१) पद : चाल : विठ्ठल रखुमाई परी—

शंकर गिरिजा पती, भोळे दैवत कैलासीचे, आले काशीप्रती ।
सवें ये दक्षसुता पार्वती ॥ धृ ॥

भक्तासाठीं तिष्ठत बसला, कनवाळू हरीहर ।
गंगामाई पतितपावना प्रक्षाळी प्रभुवर ॥
तेहतिस कोटी, देवदर्शना, येति तसे मुनिवर ।
प्रातःकाळीं उठविति गाउनि स्तुतिस्तोत्रें किन्नर ।
मस्तकि गंगा, भाळि चंद्रिका, भुजंग तनु वेष्टिली ॥
सवें ये दक्ष ॥ १ ॥

अमृत दिधलें, वीष प्राशिलें, नीलकंठ जाहला ।
तिसरा डोळा, शत कोटी रवि, तेजतपें विलसला ।
क्रोध भयंकर, विश्वनाथ हा, जाळित प्रभु मदनाला ।
भागीरथीचा प्रचंड वेगही, जटेंत गुंतविला ।
अमृतलहरी, वाहे अंतरि, भक्ताशिरीं वर्षती । सवें ये दक्ष ॥ २ ॥

## (२२) शिखरिणी

अगा पतितपावनें, ऋषि मुनी तुला वंदिती ।
तुझ्या कटिं जटी किती, जय तपासि आरंभिती ।
तुझी जरि कृपा तरी पतित होतसे पावन ।
सदाशिव शिरीं धरीं, तव पदीं करी वंदन ॥

## (२३) ओव्या

केलें गंगेंत मोदें स्नान । स्वर्गीय शोभा तेथली पाहून
साधू तापसी मुनिजन । अनुष्ठानें करिताती ॥ १ ॥
अगणित घाट विशाल पात्र । पाहोनि मंदिरें निवती नेत्र ।
असेल संचित तरीच पवित्र । गंगामाई दिसेल ॥ २ ॥

## (२४) आर्या

श्रीक्षेत्र काशिपुरीला, गौरीसह नीलकंठ पूजियला ।
अभिषेकातें करूनी, दावी नैवेद्य, वाहती त्रिदला ॥

## (२५) आर्या

सोडुनि शिवनगरीला, जातांना नयनि अश्रु घळघळलें ।
कन्या श्वशुरी जातां काय तिच्या दुःख मानसी कळलें ॥

## (२६)

वरुनि अग्निरथी करूनी त्वरा । उतरली पद विष्णु जिथे स्थिरा ।
नयनरम्य असे त्रयि संगम । पुरविली मम आस विनाश्रम ॥

## (२७) आर्या

कळले प्रयाग क्षेत्रीं उद्भवला ग्रंथि रोग भय चित्तीं ।
पुसती गयावळाला, सांगा इच्छा न येथ हो मुक्ती ॥

## (२८) शार्दूलविक्रीडित

नेत्रीं प्रेम सुधा, प्रसन्न सुखदा अर्धांगना गोपुरी ।
नक्षत्रासम बालकें सुखविती, बोलाने नानापरी ।
संपत्ती विपुला परी न दिधला, थारा कशाला मनी ।
ग्रंथी रोग कसा गुरु झडकरी, ये हांक ती ऐकुनी ॥

## (२९) पद : चाल : सांवळा वर बरा, गौरवधुला झंपा ॥

बघुनी त्या मंदिरी सांई प्रभूला ।
विस्मयें निरखिती देवलीला ॥ धृ० ॥
कफनी अंगी असे, वस्त्र ते डोईला । शीर हातावरी हा उभा ठाकला ॥ १ ॥
ध्यान तव अंतरी, तीर्थ यात्रा । घांवला सत्वरी, भक्त वेडा ॥ २ ॥
गर्व झाला मनीं स्मरतसे निशिदिनीं । मज आधि येऊनी देह हा बैसला ॥ ३ ॥

## (३०) मालिनी

झरझर नेत्रि अश्रुचा पूर लोटे । थर थर थर काया शब्दहि कंठि दाटे ।
भर भर भर येइ धावया दर्शनातें । फिरत फिरत जाई, भक्त जाईल तेथें ॥

### (३१) पद–राग–जयजयवंती

करितां का रोदना । भय भीती येथ ना ॥ ध्रु ॥
प्रभु कृपामम सदनावरती । श्रीसाईंची येथें वसती ।
धांवत येउानें संकट हारिती । कीं तू नको प्रार्थना ॥ १ ॥
ग्रंथि रोग ना ग्रासिल अपणा । धूप सुगंधी जाळुनी नाना ।
शुद्ध करीतसे वचना माना । कां चिंता ही मना ॥ २ ॥

### (३२) कटाव

पवित्र सगम तिरी हो गयावळाचें घरीं ।
प्रसन्नवदनें उभी ठाकली, सांइमूर्ति गोजिरी ॥ धृ ॥
अतिप्रेमानें मूर्ति आणिली, हत्ती वरती मिरवित नेली ।
मंदीरांत जी सुदर खोली, तिथें स्थापना शुभदिनी केली ।
शुद्धगोमये सारवलेली, झाडुनि निर्मल नित्य राखिली ।
नित्य रेखिते नवी रांगोळी, तनया मम हांसरीं ॥ १ ॥
बागबगीचा प्रभूकृपेनें, भरला आहे फळाफुलानें ।
हार गुंफिते कौशल्यानें, गळा घालिते बहुभक्तीनें ।
नैवेद्याला मधु पक्वान्नें, करी अर्धांगी अति आवडिने ।
धूपदीप कर्पूर लावुनी, आरति बालक करी । ॥ २ ॥
गालीचा मऊ मऊ शोभला, हंडवा झुंबर वरी छताला ।
संतसाधु अन् देव छबीला, थोर स्त्रीयांनीं हॉल उजाळिला ।
गुच्छ फुलांचा पात्रिं ठेविला, गुंफुनि हिरव्या पान फळाला ।
रेशमि आवरणे त्या दारा गुलाबपाणी गंध पसारिला ।
निगुण सगुण भक्त शंकरी ॥ ३ ॥
निराकार साकार होतसे । गुणी निर्गुणा भक्त कारितसे ।
त्याच्यामध्यें पूर्ण गुंगतो । भजनी त्याच्या नित्य रंगतो ।
रूप पाहुनि तद्रुप होतो । कानी त्याचें नाम ऐकतो ।
नाम कीर्तनी त्याचें घेतो । खेळवि देवा स्वयें खेळतो ।
वैकुंठाला सोडुनि राही । भक्तांच्या अंतरी ॥ ४ ॥

### (३३) भुजंग प्रयात : राग : मालकंस

कशी झाली प्राप्तही सांईमूर्ती ।
कुणी ऐकवीली इथें दूर कीर्ती ।
कसा पातला हा इथें चंद्रमौळी ।
वसे शीलधीला जया चंद्रभाळी ॥

### (३४) शार्दूलविक्रीडित

कीर्ती सद्गुरूची कुणी कथियली झालो मनीं बावरा ।
वाटे होतिल नेत्र धन्यकधि ते देखेन विश्वेश्वरा ।

### ( ३१ ) पद–राग–जयजयवंती

करितां का रोदना । भय भीती येथ ना ॥ ध्रु ॥
प्रभु कृपामम सदनावरती । श्रीसाईंची येथें वसती ।
धांवत येउनि संकट हारिती । कीं तू नको प्रार्थना ॥ १ ॥
ग्रंथि रोग ना ग्राशिल अपणा । धूप सुगंधी जाळुनी नाना ।
शुद्ध करीतसे वचना माना । कां चिंता ही मना ॥ २ ॥

### ( ३२ ) कटाव

पवित्र सगम तिरी हो गयावळाचें घरीं ।
प्रसन्नवदनें उभी ठाकली, सांइमूर्ति गोजिरी ॥ ध्रु ॥
अतिप्रेमानें मूर्ति आणिली, हत्ती वरती मिरवित नेली ।
मंदीरांत जी सुदर खोली, तिथें स्थापना शुभदिनी केली ।
शुद्धगोमये सारवलेली, झाडुनि निर्मल नित्य राखिली ।
नित्य रेखिते नवी रांगोळी, तनया मम हांसरीं ॥ १ ॥
बागबगीचा प्रभूकृपेनें, भरला आहे फळाफुलानें ।
हार गुंफिते कौशल्यानें, गळा घालिते बहुभक्तीनें ।
नैवेद्याला मधु पक्वान्नें, करी अर्धांगी अति आवडिने ।
धूपदीप कर्पूर लावुनी, आरति बालक करी । ॥ २ ॥
गालीचा मऊ मऊ शोभला, हंडवा झुंबर वरी छताला ।
संतसाधु अन् देव छबीला, थोर स्त्रीयांनीं हॉल उजाळिला ।
गुच्छ फुलांचा पात्रिं ठेविला, गुंफुनि हिरव्या पान फळाला ।
रेशमि आवरणे त्या दारा गुलाबपाणी गंध पसारिला ।
निगुण सगुण भक्त शंकरी ॥ ३ ॥
निराकार साकार होतसे । गुणी निर्गुणा भक्त करितसे ।
त्याच्यामध्यें पूर्ण गुंगतो । भजनी त्याच्या नित्य रंगतो ।
रूप पाहुनि तद्रुप होतो । कानी त्याचें नाम ऐकतो ।
नाम कीर्तनी त्याचें घेतो । खेळवि देवा स्वयें खेळतो ।
वैकुंठाला सोडुनि राही । भक्तांच्या अंतरी ॥ ४ ॥

### ( ३३ ) भुजंग प्रयात : राग : मालकंस

कशी झाली प्राप्तही सांईमूर्ती ।
कुणी ऐकवीली इथें दूर कीर्ती ।
कसा पातला हा इथें चंद्रमौळी ।
वसे शीलधीला जया चंद्रभाळी ॥

### ( ३४ ) शार्दूलविक्रीडित

कीर्ती सद्गुरूची कुणी कथियली झाली मनीं बावरा ।
वाटे होतिल नेत्र धन्यकधि ते देखेन विश्वेश्वरा ।

# सुश्लोकगीता

*
*

: अनुवादक :

*
*

वि. के. छत्रे ( कल्याण )

गीतार्थ चित्तीं दृढची ठसावा
ठसून तो आचरणींहि यावा।
म्हणूनि झालों कविताप्रवृत्त
कर्ता खरा श्रीहरि मी निमित्त ॥
गीतानुवादें जरि या कुणाला
गीताशय स्वल्प कळून आला।
संतोष झाला जरि अंतरास
होई मला नी जगदीश्वरास ॥

## श्रीमद्भगवद्गीता : अध्याय ४ था

**श्रीभगवान् म्हणाले:—**

१ योग हा अविनाशी मी विवस्वाना निवेदिला।
विवस्वानें मनूला तो, तेथें इक्ष्वाकु याजला ॥
२ परंपरेनें राजर्षी होते जाणत यापरी।
योग हा दीर्घकालानें, लोपला अर्जुना, परी ॥
३ आज मी कथिला तोची तुला योग पुरातन—।
—विशेष गुह्य, तूं माझा सखा नी भक्त जाणुन ॥

**अर्जुन म्हणाला:—**

४ अलीकडील कीं तुम्हीं सूर्य फार पुरातन।
कथिलें त्या तुम्ही पूर्वी कसें काय कळेचि न ॥

**श्रीभगवान् म्हणाले:—**

५ बा, अर्जुना, तुझे माझे जन्म कीं बहु जाहले।
स्मरती न तुला, माझे स्मरती मज चांगले ॥
६ जन्म न व्यय ना मातें, भूतांचा मी जरी धनी।
जन्म घें निजसामर्थ्यें प्रकृत्याधार घेउनी ॥
७ जेव्हां जेव्हां जगीं लोपे धर्माचरण पांडवा।
अधर्म माजतो, जन्म स्वयें मी घेइ तेधवां ॥
८ रक्षाया सज्जना तैंवी दंडायास्तव दुर्जना। घेतों प्रतियुगीं जन्म,
स्थापाया धर्म, अर्जुना ॥
९ यथार्थ जन्म ना कर्म दिव्य माझें जया कळे। देहान्ती न पुन्हा जन्मे,
मलाची येउनी मिळे ॥
१० भोगेच्छा नुरली, गेली भीति, क्रोधहि आटला। आसरा धरिला माझा,

ध्यास माझाचि लागला ॥ ज्ञानें, तपोबळें, अंतर्बाह्य जे शुद्ध जाहले ।
ऐसें बहुत बा पार्था मत्स्वरूपास पातले ॥
११ अपेक्षा धरुनी जैसी भजती मज मानव । तैसें तैसें तयातें मी देतसे
फल पांडव ॥
१२ या लोकीं फल कर्मांचें मिळतें अति सत्वर । देवतांतें फलेच्छेनें म्हणुनीं
पूजिती नर ॥
१३ निर्मिले वर्ग मी चारी, गुण नी कर्म पाहुनी । मी अंव्यय अंकर्ताची
त्यांचा, तरि धरीं मनीं ॥
१४ कर्म बाधे चिना मातें कीं नसे फल–लालसा ।
कर्म दोष न त्या लागे, ज्या कळे साच मी असा ॥
१५ पूर्वी केलें मुमुक्षूंनीं कर्म जाणोनि यापरी ।
म्हणुनी पूर्वजीं पूर्वी केलें कर्म तसें करीं ॥
१६ कर्माकर्म–विचारान्तीं ज्ञानीही पडले भ्रमीं
निष्पाप होसि जाणूनी, कथितों तेंचि कर्म मी ॥
१७ कर्मांचें नि विकर्मांचें हवें रूप कळावया ।
अकर्माचेंहि कर्माचें रूप गूढ, धनंजया ॥
१८ कर्मी अकर्म, नी कर्म अकर्मी पाहुं जो शके ।
तो योगी, बुद्धिमान्; कर्म यथा–सांग करी निकें ॥
१९ प्रवर्ते कर्मि जो इच्छा–संकल्पावांचुनी मनीं ।
ज्ञानाग्नि जाळि तत्कर्मे, सूज्ञ पंडित त्या गणी ॥
२० न हेतु कर्मी धरि, नित्य–तृप्त
तथा फलाशेंत न राहि सक्त ।
प्रवृत्त तो कर्मि जरीहि होई
करी तसे साच न कर्म कांहीं ॥
२१ आशेंत गुंते न, मनास जिंकी
उपाधि जो आणिक सर्व टाकी ।
कर्मे करील केवल जो शरीरें
न पाप त्या त्या स्वल्पहि लागतें, रे ॥
२२ लाभे जें कां सहजाचि, वसे तुष्ट जो नित्य त्यांत
बाधा द्वंद्वें करिति न नसे मत्सरा स्थान ज्यांत ।
ज्याची वृत्ती अपयश–यशीं राहते कीं समान
सारी कर्मे करूनिहि तिहीं बद्ध तो सर्वथान ॥
२३ न सक्त कोठें विषयांत, मुक्त
ज्ञानें जयाचें स्थिर होय चित्त ।
यज्ञार्थ तो कर्म करीत राही